पुणे, किशोर–वर्ष ५५, अंक ५ वा, मे २०२६ (मासिक) – किंमत रु.७/– पृष्ठे–५२.
Pune, Kishor - Vol.55, Issue 5, May, 2026 ( Monthly ) - Rs. 7 /- Pages -52

# किशोर

मे २०२६



# महाराष्ट्रात माझ्या

सचिन शिंदे

संत महंताची वाणी या महाराष्ट्रात माझ्या
तुकयाची अभंगवाणी महाराष्ट्रात माझ्या
शिवबाचा पराक्रम अन् शंभूचा पोवाडा
वीर बाजीची कहाणी या महाराष्ट्रात माझ्या
लांब फेसाळ सागर भिडे दूर क्षितिजाला
पाखरांच्या चोची गाणी या महाराष्ट्रात माझ्या
काळ्या मातीच्या गर्भात फुटे अंकुराचा बीज
शब्दे अमृताच्या खाणी या महाराष्ट्रात माझ्या
गडकिल्ल्यासवे उभा उंच सह्याद्रीचा कडा
वेरूळ–अजिंठा लेणी या महाराष्ट्रात माझ्या
ओवी, श्लोक, अभंग, हाती टाळ अन् मृदंग
वारकरी गाती गाणी या महाराष्ट्रात माझ्या
मुळा– मुठा, वैतरणा आणि गोदावरी, पूर्णा
कृष्णा– कोयनेचे पाणी या महाराष्ट्रात माझ्या
वऱ्हाडी,कातकरी, गोरमाटी आणि अहिराणी
साऱ्या बोलीच्या ह्या राणी या महाराष्ट्रात माझ्या
इथे पैंजणाची छन् पडे डफावरी थाप
जगा नाचवे लावणी या महाराष्ट्रात माझ्या

संपर्क : ९०४९५१७८३२



मे २०२६, वर्ष ५५ वे, अंक ५ वा, वैशाख-अधिक ज्येष्ठ, शके १९४७

# किशोर



# अंतरंग




- **संपादक :**
अनुराधा ओक, संचालक,
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

- **प्रकाशक :**
हेमंत बाबर
प्र. नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई

- **कार्यकारी संपादक :**
किरण केंद्रे

- **निर्मिती अधिकारी :**
सागर भापकर

- **वितरण व्यवस्थापक :**
जी. आर. पानसरे

- **मुखपृष्ठ :** मूळ फोटो – मिलिंद जाधव
डिझाईन – ओजस पारखी
विद्यार्थी : शिवराज सुरेश श्रीरामवार
जि.प.केंद्रीय प्राथ.शाळा, भोकर, जि.नांदेड

- **चित्रांकन :**
घनश्याम देशमुख, रेश्मा बर्वे, राजेंद्र गिरधारी, अजय विभुते, लोकेश कुलकर्णी, कार्टुनिस्ट इरा, लक्ष्मीकांत काळे, माईंडईट संवाद

- **अक्षरजुळणी :** किशोर विभाग





वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/– मनिऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील डिमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.

- **ऑनलाईन वर्गणीकरिता :**
www.kishor.ebalbharati.in



**पत्रव्यवहाराचा पत्ता:**
कार्यकारी संपादक, किशोर,
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
सेनापती बापट मार्ग, पुणे– ४११००४
संपादकीय : ०२०– २५७१६१०७
वितरण व तक्रार : ०२०–२५७१६२४४
ई–मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in





| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्रात माझ्या | सचिन शिंदे | २ |
| हरवलेले आजोळ | सरोज देशमुख | ६ |
| पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर | शं. ल. नाईक | ९ |
| गाढवाचा राज्याभिषेक | स्वाधीन तांदळे | १० |
| एका आयडियाची गोष्ट | दासू वैद्य | १२ |
| रानातली फुलं | विद्या सरपाते | १६ |
| चला चित्र रंगवू या | रेश्मा बर्वे | १७ |
| भीतीचा बागुलबुवा | डॉ. नंदू मुलमुले | १८ |
| आज काय झालं? | कार्टुनिस्ट इरा | २१ |
| संत कान्होपात्रा | डॉ. संगीता बर्वे | २२ |
| सुट्टीतील धमाल (चित्रकोडे) | कार्टुनिस्ट इरा | २४ |
| मैत्रिणी | रेश्मा बर्वे | २५ |




## अभिजात मराठी विभाग


| | | |
|---|---|---|
| येथल्या फुलाफुलांत हासते मराठी | प्रवीण दवणे | २६ |
| काळाचा मेळ जुळवा बरं! | डॉ. नीलिमा गुंडी | २९ |
| गंमत शब्दांची | प्रा.विश्वास वसेकर | ३१ |
| प्रश्नमंजुषा | डॉ. सुधीर मोरे | ३२ |
| गोळावाला | अशोक कोतवाल | ३३ |
| मामाच्या गावाला (एकांकिका) | प्रल्हाद जाधव | ३४ |




## बालविभाग


| | | |
|---|---|---|
| कुतूहल | योगेश दराडे | ३८ |
| भावी आधारस्तंभ | | ४० |
| उमलती प्रतिभा | | ४२ |
| चित्रकथा : निंबोली–एक अकल्पित रहस्य | घनश्याम देशमुख | ४४ |
| आई | जयवंत आवटे | ४६ |


## ENGLISH SECTION




| | | |
|---|---|---|
| The Smiling Eyes | Sadanand Pundpal | ४७ |
| Story of an Alien | Vivek Bhalerao | ४८ |
| Funny Puzzle | Ghanashyam Deshmukh | ५० |

# प्रिय किशोर



माननीय संपादक,

नमस्कार

ज्या दिवशी ‘किशोर’ मासिक हाती आलं, असं वाटलं की, बालपण परत आलं. लक्षात आलं यातलं प्रत्येक पान, लेखन, चित्र ज्ञानाचा खजिना उघडणारं आहे. खरंच ‘किशोर’ मासिक प्रत्येक वाचकाच्या मनाला जिंकून जाणारं आणि मन वेधून घेणारं मासिक आहे.

जेव्हापासून मी लहानांबरोबर ‘किशोर’चे वाचन करावयास सुरुवात केली. तेव्हापासून माझ्या वाचनाची आवड झेप घेऊ लागली आणि माझ्या ज्ञानात वृद्धी होऊ लागली. माझे मराठी भाषेचे आकलन व ज्ञान वाढू लागले. खरं सांगायचं तर ‘किशोर’ सारखे सुरेख, दर्जेदार व ज्ञान वाढवणारे मासिक मिळणे यासाठी नशीबच म्हणावे लागेल.

‘किशोर’ मधील प्रकाशित काव्य संरचना खूप सुंदर असतात. त्या चाल लावता येईल अशा असतात. त्यातील कविता वारंवार वाचाव्याशा वाटतात. म्हणून असं म्हणावे लागेल की, ‘किशोर’ मासिकाने लहानांपासून मोठ्यांपर्यंतच्या वाचनाची आवड वृद्धिंगत करण्यास मदत केली. म्हणून ‘किशोर’चे आभार मानावे लागतील.

या मासिकातील ‘अभिजात मराठी’ हा विभाग अतिशय प्रशंसनीय आहे. संपूर्ण किशोर टिमचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार.

आपला स्नेहांकित

**जुबेर खान**

जिल्हा-अकोला-४४४००६

# वाचणारं मूल सुंदर दिसतं...

हितगुज

काही चित्रं बोलकी असतात, पण काही चित्रं आपल्याला थेट एका अनामिक, प्रसन्न शांततेत घेऊन जातात. या अंकाच्या मुखपृष्ठावरील छायाचित्राकडे पाहताना साध्या कागदावरच्या अक्षरांनी निर्माण केलेलं एक निरागस, निष्पाप विश्व डोळ्यांसमोर उभं ठाकतं. तो एक छोटासा मुलगा आहे... कदाचित मातीत खेळणारा, रानात बागडणारा... पण या क्षणी त्याचं अस्तित्व त्याच्या हातातील 'किशोर' मासिकाच्या पानांमध्ये विरघळून गेलं आहे. या मुलाच्या हातांची ठेवण पहा... त्यानं ते पुस्तक किती मायेनं धरलंय! जणू काही एखादा अमूल्य ठेवाच त्याच्या हाती लागला आहे. त्याच्या कपड्यांवरील रेषा, आणि ती उघड्यावरची बैठक... हे सगळं एक निरागस सौंदर्य अधोरेखित करतं. विज्ञानाच्या भाषेत याला 'डीप वर्क' म्हणता येईल, पण साहित्याच्या भाषेत हे 'अक्षरवेड' आहे. ज्या वयात मन चंचल असतं, एका जागी स्थिर नसतं, त्या वयात एका मुलाला शब्दांनी असं खिळवून ठेवावं, हीच तर साहित्याची खरी ताकद आहे. या मुलाच्या डोळ्यांत जे तेज दिसतंय, ते उद्याच्या एका सुजाण नागरिकाचं प्रतीक आहे.

बालभारतीचं 'किशोर' मासिक केवळ मुलांचं मासिक नाही, तर ती पिढ्यान्‌पिढ्यांच्या स्वप्नांची शिदोरी आहे. या मुलाच्या हातातलं 'किशोर' त्याच्यासाठी एक जादूची कांडी आहे, जी त्याला त्याच्या छोट्याशा गावाबाहेरच्या, शाळेबाहेरच्या अथांग जगात घेऊन चालली आहे. ग्रामीण भागातील मुलांकडे महागडी खेळणी नसतील, इतर मनोरंजनाची साधने, गॅजेट्स नसतील; पण जेव्हा त्यांच्या हातात असं एखादं साहित्य पडतं, तेव्हा त्यांच्यातला 'वाचक' असा काही जागा होतो की मग त्याला तहान भुकेचीही शुद्ध राहत नाही. हे चित्र आपल्याला एकच गोष्ट सांगून जातं ते म्हणजे तंत्रज्ञानाच्या कितीही लाटा आल्या, तरी कागदावरच्या अक्षरांचं जे गारुड असतं, ते अजोड आहे. 'किशोर'च्या त्या निळ्याशार कव्हरच्या आत दडलेली कथा, कविता किंवा माहिती या मुलासाठी कोणत्याही परीकथेपेक्षा कमी नाही. भान हरपून वाचणारा हा मुलगा म्हणजे 'वाचाल तर वाचाल' या म्हणीचं चालतंबोलतं मूर्त रूप आहे. शब्दांच्या या प्रवासात तो आता इतका दूर निघून गेला आहे, जिथून परतताना तो आधीचा मुलगा राहिलेला नसेल; तो अधिक समृद्ध, अधिक प्रगल्भ होऊनच माघारी येईल.

कुठून तरी असं एखादं चित्र समोर आलं की मन भरून येतं. खेडोपाडी, डोंगरदऱ्यांत, वाड्या-वस्त्यांवर मुलांची वाचनाची भूक मोठी आहे. अक्षरांवर जीवापाड प्रेम करणाऱ्या मुलांची अजिबात कमी नाही. आपणच त्यांच्यापर्यंत पोहोचायला कमी पडतो. अशी चित्रे खूप प्रेरणा देतात, सोबतच जबाबदारीची जाणीवही करून देतात. या गोष्टी वाचतच त्यांच्या भविष्याची बांधणी होणार आहे. साहित्याच्या माध्यमातून त्यांच्या स्वप्नांना बळ देण्याचे काम आपल्याला करायचे आहे. सर्वांनीच आपापल्या परीने प्रयत्न करायला हवेत. काहीही करून मुलांच्या हातात पुस्तके पोहोचवायला हवीत. कारण हातात पुस्तक धरलेलं मूल फार सुंदर दिसतं..




**किरण केंद्रे**
**कार्यकारी संपादक**

सरोज देशमुख

# हरवलेले आजोळ

परीक्षा संपली. सुट्टीत कोण कुठे जाणार याची चर्चा सुरू झाली. प्रणवचे मित्र आपआपले बेत सांगू लागले. अनिकेत म्हणाला, ''आम्ही नेहमीप्रमाणे कोकणात गावी जाणार. तिकडे आजी, आजोबा, काका, काकू वाट पाहत आहेत. दादा आणि ताईबरोबर खूप मजा करतो मी... आंबे, फणस, करवंद खाण्यात अन् खूप भटकण्यात सुट्टी केव्हा संपते, कळतच नाही.'' सुशांत म्हणाला, ''मीपण कोकणातच आजोळी जाणार.. तिथे मामा, मामी,



आजी, मावशी माझे खूप लाड करतात..'' मानसी सांगू लागली. ''अरे, या वर्षी माझी आत्याच आमच्याकडे येणार आहे... प्रणव, तू कोणाकडे जाणार?'' ईशाने विचारले. ''आम्ही ना, यंदा मॉरिशसला जाणार आहोत...'' प्रणव म्हणाला.

''काय? मॉरिशस? मजा आहे बुवा तुझी!''

''पण तिथे कोणाकडे जाणार आहेस तू?''

ऋचा म्हणाली.

''नाही...आमचं कोणी नाहीय... पण आई आणि बाबा दरवर्षी सुट्टीत मला दूर कुठेतरी नेतात...''

प्रणवने सांगितलं पण तो फारसा खूष दिसत नव्हता. ''किती लकी आहेस रे तू! विमानातही बसाल असशील ना?''

''हो.. खूपदा'' प्रणव जेवढ्यास तेवढे उत्तर देत होता.

बोलत बोलत सर्व जण घरी परतले. प्रणव विचारात पडला. आपल्या सगळ्या मित्र-मैत्रिणींना आजोळ आहे. मामा, मामी, काका, काकू, आत्या, मावशी, आजी-आजोबा, दादा, ताई आहेत.. आपल्याला कसं कोणीच नाही? गेल्या वर्षी स्कॉलरशिपच्या परीक्षेत काका म्हणजे वडलांचा भाऊ, मामा म्हणजे आईचा भाऊ अशी सगळी नाती पाठ केली होती. पण नक्की कसे असतात हे लोक? आणि आजोळ म्हणजे काय? प्रणवला कशाचंच उत्तर मिळेना!

रात्री जेवताना तो गप्पगप्पच होता. त्याला खूष करण्यासाठी बाबा म्हणाले, ''काय प्रणव, मग नक्की जायचं ना मॉरिशसला?'' प्रणव आनंदाने होकार देईल असा त्यांचा अंदाज होता. पण तो एकदम म्हणाला, ''नाही बाबा! मला नाही, जायचं मॉरिशसला... आपण या वर्षी आजोळी जाऊ..'' आईने चमकून बाबांकडे पाहिले. तेही गोंधळून गेले, पण स्वतःला सावरून ते म्हणाले, ''प्रणव! हे आजोळ कुठून सुचलं तुला?''

''माझे सगळे मित्रमैत्रिणी सुट्टीत आजोळी जातात. त्यांना तिथे आजी, आजोबा, काका, काकू, ताई, दादा, मामा, मामी सगळे आहेत. मला मात्र कोणी नाही. आजोळ कसं असतं. ते पहायचंय मला...'' प्रणव रडवेला होऊन बोलत होता. आता मात्र आई उठली.. तिने त्याला जवळ घेऊन थोपटले आणि समजावले, ''प्रणव, आज मला थोडं ऑफिसचं काम आहे. बाबाही थकून आलेत. तूपण दमला असशील. चल, आता पट्कन जेवून घेऊ या..''

प्रणव समंजस होता. तो जेवून झोपायला गेला. त्याचे आई-बाबा म्हणजे प्रज्ञा आणि अरविंद गॅलरीत येऊन बसले. दोघांच्याही डोळ्यांसमोरून त्यांचा जीवन प्रवास सरकू लागला. अरविंद ज्या घरात लहानाचा मोठा झाला, तिथे सहा-सात मुले होती. तो सर्वांत लहान असल्यामुळे सगळे त्याचे लाड करायचे. त्यांची आई सकाळी स्वयंपाक करून बाबांबरोबर शेतावर काम करायला जाई. सर्व मुले शाळेत जात. सकाळच्या शाळेत जाणारी मुले दुपारी अरविंदला सांभाळत. सर्व मिळून घरातली लहानमोठी कामे करीत. काही दिवसांनी अरविंदही बालवाडीत जाऊ लागला.

तो जसजसा मोठा होऊ लागला, तसे त्याला कळू लागले, तो, आणि त्याच्या घरातले सर्व जण हे एकमेकांचे कोणीच नव्हते. पण सगुणा आणि सखाराम या जोडप्याने अतिशय मायेने या सर्व मुलांचा सांभाळ केला होता. परिस्थितीने गांजलेली, अगतिक आणि निराधार मुले कोणाच्या तरी मध्यस्थीने त्यांच्याकडे येत, राहत आणि शिक्षण संपवून नोकरी लागली की बाहेर पडत. त्यांची जागा दुसरी मुले घेत. पण बाहेर गेलेली ही मुले आपले घर आणि हे आई-बाबा यांना कधीच विसरत नसत. तिथल्या नवीन भावंडांच्या शिक्षणाला मदत करत. सगुणा आणि सखाराम कुठलाही गाजावाजा न करता, मुलांना सांभाळण्याचे, संस्कार करण्याचे आणि शिक्षण देण्याचे व्रत निष्ठेने पाळत होते.

सुरुवातीला लोक त्यांच्याबद्दल शंका घेत, त्यांना नावे ठेवत. पण लवकरच त्यांचे मत बदलले. सगुणा व सखाराम मुलांची घेत असलेली काळजी, त्यांची दुखणी-खुपणी काढत असताना घेतलेले कष्ट, त्यांच्यावर केलेले सुसंस्कार आणि मुलांवरची त्यांची अपार माया हे सर्व पाहून लोक त्यांना मदत करू लागले. लवकरच त्या छोट्याशा बालगृहाची रीतसर नोंदणीही झाली.

अरविंद तर अवघ्या दोन दिवसांचा असतानाच तिथे आला होता. कोणीतरी त्याला गुपचूप पायरीवर ठेवले होते. खूप चौकशी करूनही काही पत्ता लागेना, तेव्हा ते बाळ सगुणाकडे सोपवण्यात आले. त्या क्षणापासून तिने त्याला जीवापाड सांभाळले. सर्व भावंडे आपल्या या

लहान भावाचे खूप लाड करीत.

भराभर वर्षे उलटली. अरविंद हुशार होता. तो उत्तम यश मिळवत खूप शिकला. मोठ्या पदावर नोकरी करू लागला. त्याचे उमदे व्यक्तिमत्त्व, कर्तबगारी, मनमिळाऊ स्वभाव यांच्यामुळे अनेक श्रीमंत कुटुंबांकडून त्याला लग्नासाठी विचारण्यात येऊ लागले. पण अनाथ मुलीशीच लग्न करायचे असे अरविंदने ठरवले होते आणि ती आपल्या आईनेच शोधावी हा त्याचा आग्रह होता. सगुणाचे बऱ्याच अनाथाश्रमांत जाणे येणे होते. तिने प्रज्ञाला पसंत केले आणि अरविंदला सुशिक्षित, सुस्वरूप, समंजस अशी अनुरूप पत्नी मिळाली. दोघेही परदेशात गेले. प्रणवच्या रूपाने त्यांच्या जीवनात आनंद पसरला. सगुणा आणि सखाराम यांना धन्य वाटले.

भारतात परत आल्यावर अरविंद आपल्या आई-बाबांना भेटायला जायचा. पण घरी मात्र ऑफिसच्या कामाचे निमित्त सांगून तो जात असे. प्रणवला त्याने कधीच आपल्याबरोबर नेले नाही. कारण त्याला वाटायचे की, प्रणवचे मित्रमैत्रिणी, त्यांचे नातेवाईक श्रीमंत, आधुनिक राहणी असलेले, मोठमोठ्या फ्लॅट्समधून राहणारे, मोटारीतून फिरणारे असे होते. त्यांच्यापुढे सगुणा-सखाराम सारखी खेडवळ, अशिक्षित, गरीब, लहानशा घरात राहणारी माणसे किती सामान्य दिसतील.. प्रणवला का आणले नाही म्हणून सगुणा नेहमी विचारी. पण त्याची शाळा, अभ्यास, क्लासेस अशी कारणे सांगून अरविंद दर वेळी टाळाटाळ करायचा.

प्रवीणची आई प्रज्ञा हीदेखील अनाथाश्रमातच लहानाची मोठी झाली होती. तेच तिचे माहेर होते. तीसुद्धा वर्षातून तीन चार दिवस आपल्या 'माहेरी' जाऊन सर्वांना भेटून येई. सर्वांसाठी भेटवस्तू नेई... निमित्त अर्थातच ऑफिसच्या कामाचे असे! पण ही ऑफिसची कामे करून आल्यावर आपले आई-बाबा खूप खूष असतात हे आता प्रणवच्या लक्षात येऊ लागले होते.

आता मात्र प्रणवपासून हे लपवणे अशक्य आणि अयोग्यही आहे असे अरविंद-प्रज्ञाला वाटू लागले.

दुसऱ्या दिवशी रविवार होता. तिघांनाही सुट्टी होती. दर रविवारी ते गप्पागोष्टी करत एकत्र नाश्ता करायचे. आजही त्यांनी हसत खेळत खाणे उरकले. आई-बाबा चहा पिऊ लागले आणि प्रणवने दूध संपवले. त्याला एकदम आईचे कालचे बोलणे आठवले. पण तो काहीच बोलला नाही. चहाचा कप खाली ठेवून बाबा बोलू लागले. ''प्रणव! आम्ही आजपर्यंत तुला काही सांगितलं नाही. कारण तू लहान होतास...तुला ते कळलं नसतं असं आम्हांला वाटायचं. पण आता तू मोठा झाला आहेस... काल तू जे बोललास, त्यावरून तुला सगळं सांगायचं, असं आम्ही ठरवलंय...''

अरविंद बोलू लागला.. ''बाळा, मला आणि तुझ्या आईला आमचे खरे आईबाबा माहीत नाहीत..'' प्रणव एकदम कावराबावरा झाला, पण तो बाबांचे बोलणे लक्ष देऊन ऐकू लागला.

अरविंदने काहीही न लपवता त्याची आणि प्रज्ञाची जीवन कहाणी प्रणवला सांगितली. आधी बावरलेला, मग चकित झालेला, भ्यालेला प्रणव शेवटी मुसमुसून रडू लागला, आणि आईबाबांना घट्ट बिलगला. दोघेही त्याला मायेने थोपटू लागले. रडणे आवरून प्रणव म्हणाला, ''म्हणजे आई-बाबा, मलाही आजोळ आहे ना?''

आई हसून म्हणाली, ''हो रे बाळा! माझं माहेर हे तुझं आजोळ, आणि बाबांचं घर हे तुझंही घर!'' तिथे आजी-आजोबा, काका, दादा, ताई, मावशी हेही सगळे भेटतील तुला...'

''पण प्रणव, ते सगळे खूप साधे, खेडवळ आहेत रे! तुझ्या मित्रांसारखे स्मार्ट, श्रीमंत वगैरे नाहीत...'' बाबा म्हणाले. पण प्रणवचे तिकडे लक्ष नव्हते. तो खूप आनंदात होता. टाळ्या वाजवत तो म्हणाला, ''आई, बाबा या सुट्टीत आपण आजोळीच जायचं... आणि घरीसुद्धा राहायला जायचं...''

उड्या मारतच तो त्याच्या खोलीत गेला. आता तो आपल्या सगळ्या मित्रमैत्रिणींना फोन करून सांगणार होता, ''मीपण माझ्या घरी, आणि आजोळी जाणार आहे...''

त्याला त्याचे हरवलेले आजोळ, आणि घरही सापडले होते!

**संपर्क : ९८२२८१३९५०**

# पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

शं.ल.नाईक



धन्य धन्य ती अहिल्याबाई, धन्य तिची रे करणी
उंच सुराने गाऊ या रे, गाऊ तिची गाणी
महाराष्ट्र भूमीत जन्मा आली
इंदूरची मग राणी झाली
लेकरांसमान प्रजेला जपले
होळकरांच्या घराण्यात ती, दिसली रे शोभुनि

संकटरूपी वादळं आली
वीरासम ती धैर्य दाविती
स्त्रियांची फौज उभारली
शत्रूवरती होता धाक, तेजस्वी होती वाणी

तीर्थक्षेत्री बांधले घाट
शिव मंदिरांचा केला थाट
अन्नछत्रे तर तीनशे साठ
भुकेल्यांना अन्न अन् तहानलेल्यांना पाणी

पशुपक्ष्यांसाठी राखीव रान
गोरगरिबांना अन्नदान
सर्व धर्मीयांना दिला मान
शांततेचे राज्य तिचे अन् वृत्ती स्वाभिमानी

संपर्क : ९९२११२४१०२१

स्वाधीन तांदळे

# गाढवाचा राज्याभिषेक



मुलांनो, एकदा एका जंगलात एक भला मोठा सिंह राहत होता. एक दिवस त्याला लागते प्रचंड भूक. तो भक्ष्याच्या शोधात सगळीकडे फिरू लागतो. त्याला दिसतो एक कोल्हा. तो मागून गुपचूप जातो आणि कोल्ह्याला घट्ट पकडतो. सिंह खूश होत म्हणतो, ''बरे झाले सापडलास. आज मला मस्त मेजवानी मिळणार. आता मी तुला खाणार.'' घाबरलेला धूर्त कोल्हा गयावया करीत म्हणतो, ''महाराज मला खाऊ नका मला सोडा. मी तुम्हांला माझ्यापेक्षा मोठी शिकार आणून दोतो. पण मला सोडा.'' ''तुझ्यापेक्षा मोठी शिकार? ठीक आहे. मी तुला पंधरा मिनिटांची वेळ देतो. या पंधरा मिनिटांत मला तुझ्यापेक्षा मोठी शिकार आणून दिली नाहीस तर मी तुलाच खाणार सिंह कोल्हाला म्हणतो.'' ''ठीक आहे ठीक आहे'' असे म्हणत कोल्हा दुसरी शिकार शोधू लागतो.

कोल्ह्याला दिसते एक गाढव. गाढव आपले आरामात कचरा खात बसलेले असते. कोल्हा गाढवाकडे जातो आणि म्हणतो. ''अरे गाढवा, इथे असा कचरा काय खात बसला आहेस. चल लवकर... तुला तिथे सिंह बोलवतोय.'' ''मला? मला कशासाठी बोलवतोय सिंह?'' गाढव विचारतो. ''अरे सिंहाला तुला जंगलाचा राजा बनवायचे आहे.'' कोल्हा म्हणतो. गाढव आनंदाने उडी मारत म्हणतो. ''काय? मी आणि जंगलचा राजा? वा काय मजा आहे. चल चल आपण लगेच सिंहाकडे जाऊ.''

दोघेही सिंहाकडे जातात. गाढवाला पाहताच सिंह त्याच्यावर झेप घेतो. दोघांमध्ये झटापट होते. गाढव कशीबशी स्वतःची सुटका करून घेत आणि पळून जाते. या झटापटीत गाढवाचे दोन्ही कान तुटतात. गाढव पळून गेल्यावर सिंह कोल्ह्याला रागाने म्हणतो, ''बघ तो पळून गेला. त्याला परत आण नाहीतर मी तुलाच खातो.'' ''नको नको मी आणतो त्याला परत. पण मला खाऊ नका'' असे म्हणत कोल्हा पुन्हा गाढवाकडे येतो आणि गाढवाला म्हणतो. ''काय रे गाढवा, असा पळून का आलास? सिंह तुला एवढा राजा बनवत होता.'' ''याला काय राजा बनवणे म्हणतात?'' आपले तुटलेले कान त्याने दाखवले. ''बघ माझे दोन्ही कान तोडून टाकले.'' ''अरे गाढवा, तुला कळत कसे नाही? तुला राजा बनवायचे म्हणजे तुझ्या डोक्यावर राजमुकुट ठेवावा लागणार. तुझ्या दोन मोठ्या कानांमुळे तुझ्या डोक्यावर मुकुट कसा बरे बसला असता? तुझ्या डोक्यावर मुकुट नीट बसावा ना म्हणून सिंहाने तुझे कान तोडले.'' कोल्हा



गाढवाला समजावत म्हणाला. गाढव विचार करतो. 'अरे खरंच की, आपल्या दोन मोठ्या कानांमुळे आपल्या डोक्यावर मुकुट ठेवायला खरंच अडचण आली असती. कोल्हा बरोबर बोलतोय.' दोघे पुन्हा सिंहाकडे जातात.

गाढव परत आल्यावर सिंह पुन्हा त्याच्यावर झेप घेतो. दोघांत पुन्हा झटापट होते. गाढव कशीबशी स्वतःची सुटका करून घेतो आणि पळून जातो. या झटापटीत त्याची शेपूटच तुटते. गाढव पळून गेल्यावर सिंह पुन्हा कोल्ह्याला म्हणतो, ''बघ, तो पुन्हा पळाला. त्याला परत आण नाहीतर मी तुलाच खातो.'' कोल्हा म्हणतो, ''नको नको मी आणतो त्याला परत.''

कोल्हा पुन्हा गाढवाकडे येतो आणि त्याला म्हणतो, ''काय रे गाढवा, सिंह तुला एवढा जंगलाचा राजा बनवतोय आणि तू मात्र सारखा पळून येतोस.'' गाढव रागाने म्हणतो, ''पळू नाहीतर काय करू? या वेळी बघ त्याने माझी शेपूटच तोडून टाकलं.'' कोल्हा म्हणतो, ''अरे गाढवा, तुला कळत कसे नाही? तुला राजा बनवताना तुला सिंहासनावर नाही का बसवणार? सिंहासनावर बसताना तुझी शेपूट सारखी मध्ये येणार. शेपटीसह तू सिंहासनावर कसा बसणार होतास? तुला सिंहासनावर नीट बसता यावं म्हणून तुझी शेपूट तोडली. सिंहाला बघ तुझी केवढी काळजी आहे. तू मात्र सारखा पळून येतोस.''

गाढव विचार करतो. 'अरे खरंच की, शेपटीसह आपल्याला सिंहासनावर कसं बरं बसता येईल? सिंहासनावर बसताना आपल्याला शेपटीची अडचण होणार. कोल्हा बरोबर बोलतोय.'

दोघेही पुन्हा सिंहाकडे जातात. या वेळी मात्र सिंह पूर्ण तयारीत असतो. गाढवाला पाहताच त्याच्यावर झेप घेतो आणि त्याला खाऊन टाकतो. धूर्त कोल्हा मात्र गुपचुप तिथून निघून जातो.

**संपर्क :** ९६१९७८२९२९

भाग ५

दासू वैद्य

# एका आयडियाची गोष्ट

# लाडेलप्पा

पाऊस छान झाला होता. सीता नदी खळखळ वाहत होती. शेतमळे हिरवेगार झाले होते. चरणारं ढोर उंच वाढलेल्या गवतात लपून जाई. पण त्याच्या गळ्यातल्या घंटीचा आवाज कानात भरून राही. ह्या घंटीचा आवाजासारखंच म्हणीआजीचं बोलणं मला खूप आवडतं. तिच्या बोलण्यामुळं नेहमी आपल्याला काही तरी नवं कळतं. कुणाला तरी, बहुधा आईलाच म्हणीआजी सांगत होती, ‘पोळा अन् सण होती गोळा’. मला ऐकायला छान वाटलं, पण काही कळलं नाही. म्हणीआजीनं समजून सांगितलं. पोळा आला की सण सुरू होतात. होळी झाली की सण संपतात. पाडव्याला पुन्हा नवं वर्ष सुरू होतं. पोळा येतोय असं ऐकल्याबरोबर मला खंडोबाचा माळ दिसायला लागला.

चौमुख्या गणपतीच्या पारावर बसलं की समोर एक माळ दिसतो ना तो म्हणजे खंडोबाचा माळ. लाल-लाल मातीचा आणि खुरट्या-खुरट्या झाडांचा. काड्याच्या पेटीच्या आकाराचं एक छोटंसं बांधकाम दिसतंय ना ते आहे खंडोबाचं मंदिर. लांबून दिसतंय छोटंस पण आहे चांगलं आपल्या मोठ्या खोली एवढं. तुम्ही म्हणाल मला कसं माहीत. तर मी गेलो आहे माळावर. मंदिर पहायला नाही काही. मी गेलो होतो पोळ्याचे बैल नि गणपती तयार करायला लाल माती आणण्यासाठी. त्याची एक गंमत आहे. पण त्याआधी माळावरची एक छोटी गंमत आधीच सांगून टाकतो. या माळावर इथं-तिथं पसरलेली खूप दगडं आहेत. काही खूपच मोठी तर काही लहान. या दगडांखाली विंचू असतात हे माहीत होतं. दगड लहान म्हटलं तरी आमच्यासाठी मोठेच होते. म्हणून आम्ही दोघा-तिघांनी मिळून दगड ढकलला. तर दगडाखाली ओल होती आणि तरातरा पळणारे दोन-चार विंचू दिसले. एका दगडाखाली तर विंचवाची छोटुली पिल्लं होती. विंचू पाहण्याचा कार्यक्रम आटोपून आम्ही मंदिरात घुसलो. कळस नसलेलं मंदिर मी प्रथमच पाहत होतो. एक सांगायचं विसरलंच. माळावर गेल्याबरोबर आम्ही सगळ्यात आधी काय पाहिलं असेल? तर नील आर्मस्ट्राँगनं चंद्रावर गेल्यावर पृथ्वी कशी दिसते ते पाहिलं, तसं आम्ही माळावरून आमचा गाव कसा दिसतो ते उत्सुकतेनं पाहिलं. छोटी छोटी घरं, मध्येच कळस वर आलेली मंदिरं, पडकी गढी, चौकातली मशीद, गावाबाहेर नदीचा वळणदार चंदेरी पट्टा, पाण्याची टाकी, बंद पडलेली कापसाची मील, गावाला लागून असलेली तुटक तुटक वर्गाची शाळा.. वडा-पिंपळाची झाडं.. असे खूप काही. हे सगळं पाहून झाल्यावर आम्ही कामाला लागलो. म्हणजे आम्ही लाल माती उकरायला सुरुवात केली. पावसाळा सुरू असल्यामुळे मऊ माती सहज उकरली जात होती. बैल आणि मोठ्ठा गणपती करायचा असं मनात ठरवल्यामुळे मातीचा मोठा गोळा तयार केला. या गोळ्याला पळसाची पानं लावली की झाली पॅकिंग. आता बऱ्यापैकी संध्याकाळ झाली होती. मातीचा वजनदार ओला गोळा डोक्यावर घेऊन घर गाठायचं म्हणून गडबड झालेली. बरंच काही बघायचं राहून गेलं. कपड्याला ठिकठिकाणी मातीचा लाल रंग लागलेला. पानात बांधलेला मातीचा गोळा उचलतानाच जड झाला. हावरटपणाने घेतलेली थोडी माती तिथेच कमी करावी लागली. मनातल्या गणपतीचा आकार थोडा लहान झाला म्हणून वाईट वाटलं.



रिकाम्या हाताने माळ चढताना मजा वाटली. पण

आता उतरताना घसरगुंडी; ओला रस्ता आणि डोक्यावर मातीचा ओला गोळा. झाडाझुडपातून एकेरी पायवाट, चौघांना एका मागे एक चालावं लागत होतं. चुकून मागच्याचा पाय घसरला तर समोर चालणाऱ्याचं काही खरं नव्हतं. चित्रात रंग भरल्यासारखा भोवताली काळा अंधार वाढू लागला. घरच्यांच्या शिव्या खाव्या लागणार यापेक्षा काळवंडू लागल्यावर झाडांची भीती वाटू लागली. वरतून गावातल्या घराघरांत उजेड दिसत होता. माळ अर्धा उतरूनही झाला नसेल तेवढ्यात गण्या दगडाला पाय अडकून पडला. लागलं नाही. मातीचा गोळा फुटला. सगळे घामाघूम झालेले. तहान लागलेली. पण पाणी नाही. शेवटी काहीही न बोलता आम्ही चौघांनी अर्धी माती कमी केली. मनातला गणपती अजून लहान झाला. संध्याकाळ पूर्ण काळवंडली. हलका झालेला मातीचा गोळा घेऊन आम्ही निमूट उतरू लागलो. डोक्यावरचं वजन कमी झाल्यामुळे पायांना गती आली होती. कसं तरी डोंगर पायथ्याशी येऊन पोचलो. मातीच्या ओझ्यानं मान दुखत होती. तिथे एक छोटं मंदिर होतं. पाण्याची बारव होती. पण अंधारामुळे पाणी पिणार तरी कसं? डोक्यावरची माती मंदिराच्या ओट्यावर ठेवून आम्ही हाशहूश करीत बसलो. पाय दुखत होते. तेवढ्यात समोरच्या झुडपात काहीतरी चमकलं. मी तिकडे पळालोच. जवळ जाऊन पाहतो, तर लग्नात- दिवाळीत छोट्या छोट्या लाईटच्या माळा लावतात ना. त्यापेक्षाही छोटे आठ-दहा लाईट फांदीवर चमकत होते आणि हलतही होते. ही अद्भुत लाईटिंग बघून मी ‘सुऱ्या ऽ .. गण्या ऽ .. सुभ्या ऽऽ’ अशा आनंदाने हाका मारल्या. सुऱ्या शेतवाला असल्यामुळे त्याने सांगितलं, ‘‘अरे हे तर काजवे आहेत.’’ मी काजव्यांबद्दल ऐकून होतो. पण अचानक एवढे काजवे चमकताना पाहण्याची मज्जाच वेगळी होती. बोलताना सुऱ्याने एक काजवा धरून मला दिलाही. तो चमकणारा काजवा मी शर्टच्या खिशात ठेवला तर कपड्यांतूनही





तो चमकत होता. मला एक आयडिया सुचली, गणपतीची मूर्ती तयार झाल्यावर डोळे म्हणून दोन काजवे लावले तर काय मज्जा येईल सुऱ्या हसून बोलला, ''अहो आयडियावाले, ते काजवे एका जागी कसे बसतील? उडून जातील ना.'' गण्या मध्येच बोलला, ''मग माती ओली असताना त्यांना मूर्तीवर चिकटून टाकायचं'' आता सुऱ्या जोरात हसला, ''बावळट, ते मरून जातील ना. आणि मेल्यावर कसे चमकतील...?

खूप उशीर झाला होता. अजून घर गाठायचं होत. मातीचे गोळे डोक्यावर घेऊन निघालो. पुन्हा एकदा गण्याने थोडी माती कमी केली. त्याच्या मनातला गणपती अजून थोडा लहान. झाला. थकून भागून आम्ही घरी आलो. भरपूर शिव्या खाल्या पण माझ्या डोळ्यांसमोरून चमकणारे काजवे काही जाईनात. देवासमोरच्या समईवर एक काजवा बसलाय, कंदिलात एक मोठ्ठा काजवा अडकलाय, उदबत्तीच्या टोकावर एक लाल काजवा आहे असं वाटू लागलं. रात्री झोपलो तर स्वप्नही काजव्यांचंच म्हणजे स्वप्नात आमच्या घरावर लाईटिंग केल्यासारखे काजवे बसलेत असं

दिसलं. कदाचित यातूनच माझ्या डोक्यात एक आयडिया आली. रात्र झाली की ओसरीवर अंधार पडायचा. तेव्हा आमच्या घरी लाईट नव्हते. आई ओसरीत कंदील लावायची. पण कंदिलाचा प्रकाश एवढ्या मोठ्या ओसरीत जेमतेम पडे. मी ठरवलं, काजव्यांच्या मदतीनं संपूर्ण ओसरी लख्ख प्रकाशाने भरून टाकायची. दुसरेच दिवशी कामाला लागलो. शाळेत ही आयडिया फक्त सुऱ्या उर्फ सुरेशला सांगितली. तो नेहमीप्रमाणे बिनधास्त बोलला ''चालेल. करून तर बघू. होईल ते होईल.'' आम्ही मोहिमेचा दिवस ठरवला. त्याआधी गण्या उर्फ गणेशला या योजनेत घ्यायचं नाही असं ठरलं. कारण त्याने सगळाच पचका केला असता. ठरलेल्या दिवशी संध्याकाळी पाच वाजताच जेवण उरकून, 'मंदिरात भजनाला जातोय' असं सांगून घर सोडलं. झपाझप चालत दोघेही माळाच्या पायथ्याशी येऊन बसलो. मंदिरावरील फडफडणारी पताका, भोवतीची झाडं, संपूर्ण माळच अंधारात बुडू लागला. गावातल्या घरांत प्रकाश चमकू लागला. घरांवरती धूर उंच-उंच जात होता. सुऱ्याचं आणि माझं लक्ष मात्र बारवेजवळच्या झुडपाकडेच होतं. सोबत सगळं साहित्य आणलेलंच होतं. आज अंधाराचीही भीती वाटत नव्हती, कारण डोक्यात एक लक्ष्य होतं. तेवढ्यात समोरच्या झुडपांत काजवे चमकू लागले. काजव्यांचे झुपकेच झाडांत होते. एखादं चमकणारं हलतं झुंबर पाहावं तसं वाटत होतं. आम्ही खूश झालो. खिशातल्या रिकाम्या बाटल्या काढल्या. आम्ही या बाटल्यांच्या झाकणांना छोटी-छोटी छिद्रे पाडली होती. झाकण लावल्यावर बाटलीत हवा जावी म्हणून ही व्यवस्था होती. या बाटलीत भरपूर काजवे पकडायचे. झाकण लावून बाटली घरी न्यायची. ओसरीत बाटली ठेवली की काजव्यांचा लख्ख प्रकाश पडणार होता. मग ओसरीवर उजेडच-उजेड. आईचं कंदील लावायचं रोजचं काम वाचणार होतं. शिवाय गावातल्या अनेकांनी ही आमची आयडिया वापरून घरात लख्ख प्रकाश पाडला असता. आई-बाबांना अभिमान आणि सगळ्यांना आश्चर्य वाटलं असतं. अर्थात हे आम्ही आधी कुणालाच सांगितलं नव्हतं. माझाच विचार सुरू होता. सुऱ्याने शर्ट ओढला म्हणून भानावर आलो. आम्ही दोघांनी दोन बाटल्यात काजवे पकडायला सुरुवात केली. उजेड पडण्यासाठी खूप काजवे हवे होते. कसे तरी दोन-चार बाटलीत घेतले की, आधीचे निसटून जात. शेवटी खूप प्रयत्नांनी आम्ही बाटलीत काजवे पकडले. झाकण लावलं. प्रकाशाची उघडझाप होऊ लागली. हातात धरलेल्या बाटलीत काजवे चमकताना बघून खूप आनंद झाला. आम्ही काजव्यांच्या प्रकाशाला हातात धरलं होतं. आमची योजना यशस्वी झाली होती. सुऱ्या भानावर येत म्हणाला, ''आता आपण लवकर घरी गेलं पाहिजे.'' बाटल्यांवरचे हात अधिक गच्च करीत आम्ही घराकडे धूम पळत सुटलो.

झोपाळ्यात बाबा बसले होते. कंदिलाचा प्रकाश होता. आम्ही धापा टाकत पोचलो. एवढ्या अंधारात आम्हांला असे आलेले पाहून बाबा रागावले होते. सुऱ्या मागच्या मागे पळून गेला. बाबांचा मोठा आवाज ऐकून आई ओसरीत आली. आईही रागातच बोलली, ''मागे हातात काय लपवतोयस रे?'' मी हात पुढे केला. तेव्हा बाटलीवरची हाताची पकड सैल झाली. बाटलीत तेव्हासारखा प्रकाश नव्हता. एखाद-दुसरा काजवा चमकायचा. दरम्यान हे सर्व बघायला घरातले सगळेच ओसरीवर जमले. बाबा ओरडले, ''कसली बाटली आहे ती. आणि त्यात काय चमकतंय?'' काही तरी चमकलेलं सगळ्यांनी पाहिलं याचा मला आनंद होत होता. आईने बाटली हिसकावूनच घेतली. तिनं नीट पाहिलं. बरेच काजवे मेले होते. एखाद-दुसरा जिवंत होता. आईला काय प्रकार आहे ते कळेचना, ''अरे दुष्टा, मेले की रे किडे, का पकडलंस त्यांना असं?'' मग मात्र मी सविस्तरपणे आमची मोहीम सांगितली. रागावलेले आई-बाबा आमची आयडिया ऐकून हसत होते. खरं तर आमची आयडिया त्यांनाही आवडली होती. म्हणून तर हसताना आईने मला जवळ घेतलं होतं. म्हणीआजी कौतुकानं माझ्याकडे पाहत होती. बाबा तर चक्क म्हणाले, ''शास्त्रज्ञ, आता उठा हात-पाय धुवून जेवून घ्या आणि आधी ते दोन-चार काजवे जिवंत असतील तर त्यांना सोडून द्या.'' मी बाटलीचं झाकण उघडलं. दोन काजवे जिवंत होते. त्यांना धरून अंगणातल्या झाडावर ठेवलं आणि कंदिलात कोंडलेली वात विझत नाही तसा बाटलीतला काजवा जिवंत राहिला पाहिजे. यासाठी माझ्या डोक्यात नव्या आयडिया सुरू झाल्या.

**संपर्क : ९४०३५८४१११**



विद्या सरपाते

# रानातली फुलं

रानातली फुलं आम्ही वाऱ्यावर डोलतो
फुलपाखरांच्यापरी फुलांसवे बोलतो
ऊन, वारा, थंडी, धारा, अंगावर झेलतो
काट्यांतून गवतात, अनवाणी चालतो
वादळांना, वेदनांना सहजच पेलतो
रानातंली फुलं आम्ही वाऱ्यावर डोलतो

झाडावर चढूनिया, डहाळीला झुलतो
इवल्याशा बिजापरी, मातीमंधी फुलतो
पाखरांच्या गाण्यालाही तालावर खुलतो
रानातली फुलं आम्ही वाऱ्यावर डोलतो

बांधावर फिरूनिया, रानमेवा चाखतो
पाण्यामध्ये खेळूनिया, चिखलाने माखतो
मातीतले डाव सारे आम्हीच ते आखतो
रानातली फुलं आम्ही वाऱ्यावर डोलतो

कळपाच्या मागे मागे, धिटाईने पळतो
सवंगडी होऊनिया, प्राण्यांसंग खेळतो
खेळूनिया, कष्टुनिया तृणावर लोळतो
रानातली फुलं आम्ही वाऱ्यावर डोलतो

निसर्गाच्या संस्कृतीत, संस्काराने भरतो
दया, क्षमा, ऋण, दान काळजात कोरतो
पुस्तकाच्या वासासाठी मनी मात्र झुलतो
रानातली फुलं आम्ही वाऱ्यावर डोलतो

संपर्क : ९३०९७४३२४६

## * चला चित्र रंगवू या...!!!

**उन्हाळ्याच्या सुट्टीत तुम्ही काय काय मजा करणार बरं ? चित्र पूर्ण करा, नवीन ठसे उमटवून बघा. त्यातून प्राणी, पक्षी काढता येतात का ?**

रेश्मा बर्वे



भाग ५



# भीतीचा बागुलबुवा

डॉ. नंदू मुलमुले

भाग्येश हा सहावीत शिकणारा मुलगा. लहानपणापासून त्याला सारे 'भागू' म्हणायचे. त्याला खूप भीती वाटायची. परीक्षेची, प्रवासाची. आवाजाची, अंधाराची. पाण्याची, पोहण्याची. उंचावरनं डोकावण्याची, गर्दीत दाटीवाटीची. हळूहळू मित्र त्याला 'भित्रा भागू' म्हणायला लागले.

रात्री वीज गेली, दिवे अचानक विझले, की भागू घाबरून दादाला घट्ट धरायचा. पावसाच्या दिवसांत नदीला जोर चढला, की पाण्याला पाहून भ्यायचा. पहाड उड्या मारत चढायचा, पण कड्यावरनं खाली दरीत पाहायला घाबरायचा. प्रवासाला निघाला, अंगावर येणाऱ्या त्या इंजिनाची झुकझुक कानी पडली, की छातीत धडधड सुरू व्हायची. बाकी सारे जण मजेत असायचे, प्रवासाचा आनंद घ्यायचे. दादा इंजिन ड्रायव्हरशी बोलून यायचा, तर भागूच्या हातापायाला थरथरी सुटलेली असायची. मंदिरात दर्शनाच्या रेटारेटीत आईबाबा उभे राहायचे, भागू आपला घामाझोकळ. कसाबसा बाहेर पडायचा.

उन्हाळ्याची सुटी. शहरातून मोहनदादा आला होता गावी. तो दोनचार पोरांना घेऊन पोहायला निघाला नदीवर. ''चल भागू तूही.'' त्याने आग्रह केला.

''दादा, तो नाही येत म्हणतो, भितो पाण्याला,'' मुलं ओरडली. भागू निघायचा तो थांबला.

दादा शहरात मानसशास्त्र शिकत होता. त्याने भागूची भीती ओळखली.

''भागू, चल, भिऊ नकोस, मी तुला शिकवतो. आपल्याजवळ भोपळा आहे कमरेला बांधायला.'' दादाने त्याचे कपडे पिशवीत घातले.

नदीच्या स्वच्छ, उथळ किनारी दादाने कपडे

टाकले. सारी मुलं हुंदडत पाण्यात शिरली. भागूच्या अंगावर पाणी उडवू लागली. भागू अजून भिऊ लागला.

दादाने भागूच्या कमरेला भोपळा घट्ट बांधला. जसजसे पाणी जवळ येऊ लागले, भागू पाय मागे खेचू लागला. मग दादाने काठावरील वाळूत बसकण मारली. भागूला समोर बसवले आणि तो त्याला समजावू लागला.

''भागू मला सांग, भीती म्हणजे काय?''

''दादा, माझी छाती जोरजोरात धडधडते, हातपाय थरथर कापतात, दम कोंडायला लागतो. दूर पळून जावेसे वाटू लागते. नुसत्या कल्पनेनेही मला घबरायला होते.''

''म्हणजे मनात भीती वाटली की शरीर घाबरते. पण मन कशाला घाबरते?''

''मी बुडेन, श्वास कोंडेल, मी मरेन...''

''अंधारात मला भूत पकडेल, पेपर अवघड जाईल, मी नापास होईन, मी कड्यावरून उडी मारेन, गर्दीत माझा दम कोंडेल, प्रवासात मोटारीचा अपघात होईल, सगळीकडून भीतीचा मारा, हो ना?'' दादाने जंत्री पूर्ण केली. ''पण कधी असं झालंय का?''

''नाही..नापास नाही झालो कधी, अपघातही नाही...पण..'' भागू चाचरत बोलू लागला.

''अंधार, भूत, अपघात, पाणी, गर्दी, सगळी भीती तुझ्या मनात आहे. भित्या पाठी ब्रह्मराक्षस.''

''माझे मित्र घाबरत नाहीत, मलाच लहानसहान गोष्टींची भीती का वाटते?''

''भागू, भीती ही माणसाची संरक्षक व्यवस्था. ती माणसाचा संकटांपासून बचाव करते. पण संकटे नसताना येताजाता भीतीचा अलार्म वाजू लागला तर भीतीची दुर्भिती होते. 'फोबिया' होतो. अनाठायी भीती.''

''दादा मला सगळे 'भित्री भागुबाई' म्हणून चिडवतात. ती कशी घालवायची?''

''चल तुला प्रात्यक्षिक दाखवतो!'' दादाने भागूला उचललं आणि पाण्यात टाकलं. मागून स्वतः उडी घेतली. भागुची घाबरगुंडी उडाली. तो हातपाय झाडू लागला. त्यांच्या नाकातोंडात पाणी जाऊ लागलं. काही सेकंद गेले, दादाने त्याला हाताने तोलून धरलं. आता भागू व्यवस्थित हातपाय हलवू लागला. ''पाण्याबाहेर




दीर्घ श्वास ओढायचा, पाण्याच्या आत हळूहळू सोडायचा.'' मग भागू चुकतमाकत पोहू लागला. त्याला मजाही वाटू लागली.

डोके पुसतापुसता दादाने सांगितलं, ''भीती घालवण्याचा एकमेव उपाय, वारंवार भीतीचा सामना करणे. पाण्याची भीती? रोज पोहायचं. अंधाराची भीती? मुद्दाम अंधारातून जायचं. परीक्षेची भीती? वारंवार परीक्षा द्यायच्या. गर्दीची भीती? गर्दीत फिरून यायचं.''

''आणि तरीही भीती वाटली तर?''

''आत्ता पोहताना काय केलंस? दीर्घ श्वास घ्यायचा. काही सेकंद रोखून धरायचा. हळूहळू सोडायचा. एक मंत्र म्हणायचा!''

''मंत्र?''

''हो. म्हण; मला भीती वाटते आहे!''

''मला भीती वाटते आहे..''

''तरीही मी शांत आहे...एवढं म्हटलं की भीतीचा स्वीकार होतो. हो, मी घाबरलो आहे, पण मी पळणार नाही. दीर्घ श्वास, तो घेईपर्यंत भीती कमी होते.''

''एवढ्यानं होईल कमी?''

''क्रिकेट कसं शिकलास?''

''रोज खेळून. प्रॅक्टीस करून..''

''तसंच भीतीचं. रोज सामना करायचा. भ्यायचं, पण पळायचं?''

''नाही!'' भाग्येशने समाधानाने दादाला टाळी दिली.

**संपर्क : ९४२२८७३३०३**

# इयत्ता आठवीच्या मराठी व इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांसाठी 'बालभारतीची' दर्जेदार व गुणवत्तापूर्ण प्रात्यक्षिक कार्य नोंदवही



तज्ज्ञ शिक्षकांच्या सहाय्याने इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी दैनंदिन तसेच स्वयंअभ्यासाकरिता आणि उजळणीकरिता तयार करण्यात आलेल्या विविध विषयांच्या उपयुक्त प्रात्यक्षिक नोंदवह्या.







नोंदणीकृत विक्रेते व शैक्षणिक संस्थांना १५% सवलत

वरील प्रात्याक्षिक कार्य नोंदवही खरेदीकरिता मंडळाच्या खालील विभागीय भांडार व्यवस्थापकांशी संपर्क करावा

विभागीय भांडारे

पुणे–९४२३००५०७०, मुंबई (गोरेगाव)– ९४२३००५०७१, छत्रपती संभाजीनगर– ९४२३००५०७३, नागपूर– ९४२३००५०७२, नाशिक–९४२३००५०७४, लातूर– ९४२३००५०७५, कोल्हापूर– ८७९९९०९६५६, अमरावती ९४२३००५०७७, पनवेल– ९४२३००५०७८

# आज काय झालं ?



कार्टुनिस्ट इरा
संपर्क: ९४२२३२५८३८

कुहू-नीलला नुकतीच उन्हाळ्याची सुट्टी लागली आहे. आणि अशाच एका दुपारी...




बालदोस्तांनो, तुमच्याबाबतीत पण असं कधी घडलंय का? तुमची झालेली फजिती नक्की लिहून पाठवा :)

बालभारतीच्या कविता

# संत कान्होपात्रा

भाग ५

(पंधरावे शतक)

डॉ. संगीता बर्वे

नको देवराया अंत पाहू आतां ।
प्राण हा सर्वथा फुटों पाहे ।।१।।

हरिणीचें पाडस व्याघ्रें धरियेलें ।
मजलागीं जाहलें तैसें देवा ।।२।।

तुजवीण ठाव न दिसे त्रिभुवनीं।
धावें हो जननी विठाबाई ।।३।।

मोकलोनी आस जाहलें मी उदास ।
घेई कान्होपात्रेस हृदयात ।।४।।



कान्होपात्रा ही पंधराव्या शतकातील मराठी संत कवयित्री. पंढरपूरजवळ मंगळवेढा यथे राहणाऱ्या श्यामा नावाच्या गणिकेची (नर्तिकेची) कान्होपात्रा ही मुलगी. कान्होपात्रा अतिशय देखणी होती. तिच्या सौंदर्याची कीर्ती बेदरच्या बादशहापर्यंत पोहोचली होती. तेव्हा बादशहाने तिला बेदर येथे घेऊन येण्यासाठी शिपाई पाठवले, पण कान्होपात्रा वारकऱ्यांच्या मेळ्याबरोबर विठ्ठलाचा धावा करत पंढरपुरास जाऊन पोहोचली. महाद्वारी बसून तिने अत्यंत आर्ततेने विठ्ठलाचा धावा करत तेथेच प्राण सोडला अशी कथा आहे. बादशहापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी विठ्ठलाची आळवणी करताना उत्स्फूर्तपणे तिने रचलेला हा अभंग आहे. कान्होपात्रा म्हणते,

हे देवराया, तू आता माझी आणखी परीक्षा पाहू नकोस. माझा प्राण जाईल की काय, ऊर फुटेल की काय असे मला वाटू लागले आहे. ।।१।।

हे देवा, हरिणीच्या कोवळ्या पाडसावर वाघाने झडप घातल्यानंतर त्याची जी मरणप्राय अवस्था होईल तशीच माझीही अवस्था झाली आहे. ।।२।।

हे विठाबाई, माझे आई, या त्रिभुवनात माझे रक्षण करणारा तुझ्याशिवाय कोणीच नाही. आई, माझ्या रक्षणार्थ धावत ये. ।।३।।

तुझ्या भेटीची इच्छा अपुरीच राहील की काय या भीतीने मी उदास झाले आहे. हे विठाई, या कान्होपात्रेला तुझ्या हृदयाशी धर. ।।४।।

अशा प्रकारे अत्यंत आर्ततेने कान्होपात्रेने विठुमाऊलीचा धावा केला आहे. एखाद्या लहान बालकाने आईकडे धाव घ्यावी, तितक्या सहजपणे भक्ताने देवरूपी आईकडे धाव घेतली आहे. विठ्ठलाला तिने मातेची उपमा दिली आहे.

राजाचे शिपाई तिला पकडून नेण्यासाठी आले असताना कशीबशी सुटका करून कान्होपात्रेने सरळ पंढरपूर गाठले. तिची आई गणिका असूनही भक्तिमार्ग हा सर्वश्रेष्ठ आहे असा संस्कार संतसहवासामुळे कान्होपात्रेवर झाला होता. आईची इच्छा की आपल्या मुलीने आपला व्यवसाय पुढे चालवावा, राजाची इच्छा पूर्ण करावी. पण संस्कारशील कान्होपात्रेने त्यास नकार दिला आणि ती सरळ विठुमाऊलीच्या पायाशी आली.

गणिकेची मुलगी म्हणून विठ्ठलमंदिरात तिला प्रवेशही मिळाला नसावा म्हणून महाद्वारात उभी राहूनच ती विठाईला विनवू लागली.

'हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले' असा अत्यंत समर्पक दृष्टान्त कान्होपात्रेने आळवला आहे. हरिणी अत्यंत निष्पाप असते. सुकुमार असते. तिचे पाडस तर किती निरागस, सुकोमल! कान्होपात्रेने स्वतःला 'हरिणीचे पाडस' म्हटले आहे. वाघासारख्या एखाद्या क्रूराने झडप घातल्यावर हरिणीचे पिलू जसे रक्तबंबाळ होऊन प्राण सोडेल तशी कान्होपात्रेची स्थिती झाली आहे. विठाई, तूच आता माझा प्राण वाचव असा आकांत ती करते आहे. निष्पाप गोजिरवाण्या पाडसाचा वाघापुढे निभाव लागणार नाही, पण सर्वांचा रक्षक परमेश्वरच आता पाडसाला वाचवू शकेल असा विश्वास तिला वाटतो आहे.

सर्व प्रकारच्या आशाआकांक्षांचा त्याग करून, विरक्त होऊन; कसलीही इच्छा न ठेवता मी तुझ्यापाशी आले आहे. आई, मला तुझ्या पदरात घे असा आर्त टाहो या संपूर्ण अभंगामध्ये आहे.

कान्होपात्रेच्या या अभंगामध्ये विलक्षण कारुण्य आहे. रचनेचे सौंदर्य तर आहेच, पण परमेश्वरावर पूर्ण श्रद्धा ठेवून तो कोणत्याही कठीण परिस्थितीतून आपल्याला सोडवेल असा विश्वास आहे. समर्पक दृष्टान्त देण्याची क्षमता तिच्या ठायी आहे. अभंगामध्ये प्रसंगाचे नाट्यपूर्ण दर्शन घडते. कान्होपात्रेची मनःस्थिती त्यातून प्रकट होते.

त्या काळामध्ये ज्ञानेश्वर, नामदेवांच्या पुढाकारामुळे समाजाच्या वेगवेगळ्या स्तरांमधे विठ्ठलभक्तीचा प्रसार झाला. त्यामुळे सामान्य अशा नर्तिकेच्या मुलीला सुद्धा जीवनात श्रेष्ठ काय आणि त्याज्य काय हे समजले होते. सर्व संत कवयित्रींमधे कान्होपात्राच तशी एकाकी होती. मुक्ताबाई तीन भावंडांमध्ये वाढली. जनाबाई नामदेवाच्या घरी होती. चोखामेळ्याची बहीण असलेल्या निर्मळेलाही घरचाच संतसहवास लाभला होता. पण कान्होपात्रेला मात्र भक्तिमार्गाकडे नेणारे घरातले कोणीही नव्हते. तरीदेखील तिने ईश्वरभक्तीचे रहस्य जाणले आणि जीवावर उदार होऊन परमेश्वराचा धावा केला. यात तिच्या भावभक्तीने भारलेल्या संस्कारशील आणि निर्मळ मनाचा प्रत्यय येतो.

## सुट्टीतील धमाल

रचना: कार्टुनिस्ट इरा
संपर्क: ९४२२३२५८३८

### चला खेळूया...

उद्दिष्ट : उन्हाळ्याच्या सुट्टीतील मजा :)
काय हवं : फासा व सोंगट्या
खेळण्याची पध्दत : एक क्रमांकाच्या चौकोनापासून खेळास सुरुवात करावी. प्रत्येक चौकोनासमोरील आज्ञेप्रमाणे उत्तर द्यावे. सर्व घरे पूर्ण करणारा/री खेळाडू विजयी ठरेल!



# मैत्रिणी

रेश्मा बर्वे

ऊन उतरलं अंगणात
सावल्या झाल्या लहान
साळुंख्या करती कलकल
ओरडून लागली तहान

ताईबाई आली अंगणात
पाण्याने भरली घागर
दाणे आणले मूठभर
ताई माझी हुश्शार!

साळुंख्या बघती टुकुटूकू
पाणी इवल्याशा चोचीत
ताई गुपचूप बाजूला
बसली पुस्तक वाचीत

बोलघेवड्या साळुंख्या
भिरभिर करती अंगणी
ताई म्हणते कशी मला
आल्या गं तुझ्या मैत्रिणी!



संपर्क : ९९६०३०४४४१

**मराठी अभिजात भाषा झाली, आता तिची वाटचाल ज्ञानभाषेकडे होणे आवश्यक आहे. या प्रयत्नात खारीचा वाटा म्हणून विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी जागरूकता वाढवण्यासाठी 'बालभारती' आणि महाराष्ट्र शासनाचा 'मराठी भाषा विभाग' मिळून 'अभिजात मराठी' हा उपक्रम राबवण्यात आला. पुढील विविध सदरांच्या माध्यमातून दरमहा सहा पाने मराठी भाषेच्या गौरवासाठी राखीव ठेवण्यात आली होती. आपण सारे मिळून मराठी भाषेचे जतन व संवर्धन करूया.**

# येथल्या फुलाफुलांत हासते मराठी

प्रवीण दवणे

मराठी भाषेची समृद्धी आणि तिच्यात दडलेले सौंदर्य आपण अगदी आनंदाने वेचत आहोत. वेगवेगळ्या म्हणींच्या गमती, वाक्प्रचार, शब्द, कवींची भाषाशैली, मनावर राज्य करणाऱ्या मराठी साहित्यिकांचे मनाला भुरळ पडणारे चिंतन हे आपण पाहत आहोत. आजचा वेचू आनंदे, हा अगदी विशेष आहे, कारण १ मे आपला मराठी राजभाषा दिवस आणि त्यामुळेच राजभाषा दिवसाविषयी जाणून, आणि त्या दृष्टीने आपली भाषेबद्दलची कर्तव्ये अगदी थोडक्यात जाणून घ्यायला आपल्याला नक्कीच आवडेल. राजभाषा दिवस का? आणि कशासाठी? त्यामुळे मराठी भाषा कशी अधिक जोपासली जाणार आहे, हे पाहणार आहोत. त्यामुळे आजचे मनोगत किशोर मित्रमैत्रिणींसाठी तर आहेच, पण खरे तर ही पिढी घडवणाऱ्या पालक आणि शिक्षकांसाठी आहे. चला तर वेचू आनंदे...

आपला भारत देश १५ ऑगस्ट १९४७ ह्या दिवशी स्वतंत्र झाल्यानंतर देशातील विविध भाषा आणि त्या भाषांची समृद्धी जपत राहावी म्हणून भाषेप्रमाणे प्रत्येक राज्याची रचना केली. आणि १ मे १९६० रोजी मराठी भाषेला राजभाषेची मान्यता देण्यात आली. म्हणूनच हा दिवस 'मराठी राजभाषा दिवस' म्हणून महाराष्ट्रात साजरा होतो. तसेच्या श्रमिक शक्तीचा गौरव करण्यासाठी 'कामगार दिवस' म्हणूनही साजरा होतो. परंतु आपण ह्या मनोगतातून मराठी भाषेचा अभिजात आनंद घेत असतो; म्हणून मराठी राजभाषा दिवस कशासाठी, याचा थोडा विचार करणार आहोत.

सुमारे दीडशे वर्षांहूनही अधिक काळ इंग्रजांचा अंमल आपल्या देशावर असल्यामुळे, मराठी भाषेला त्याची झळ लागू नये, मराठी भाषेची सर्व वैशिष्ट्ये जपली जावीत म्हणून शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला. ज्या दिवशी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली तो दिवस मराठी भाषा दिवस म्हणून साजरा व्हावा, हे निश्चित केले. वर्षभर उपक्रम व्हावेत असा आग्रह असतो. परंतु त्या आग्रहाला एका सांस्कृतिक उत्सवाचे स्वरूप यावे यासाठी हा एक महत्त्वाचा दिवस १ मे!

# लाभले अम्हास भाग्य बोलतो मराठी



**मराठी राजभाषा दिवस**

इंग्रजीच काय, परंतु जगातील कुठल्याही भाषेला आपण कमी लेखत नाही, परंतु त्याबरोबरच मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित व्हावे; शब्द आणि तिच्या बोलीभाषेचे सौंदर्य जपले जावे, हा आग्रह आवश्यक. जशा देशातील महानद्या महत्त्वाच्या, तशाच इतर नद्या, उपनद्या, झरे, ओहळ हेही. या सगळ्या प्रवाहांमुळे, धरणी सुजलाम सुफलाम होते, त्याप्रमाणे मराठी भाषा ही विविध बोलीभाषांचे सौंदर्य आणि वेगळेपण, मुख्य प्रवाहाला मिळून समृद्ध होते. म्हणूनच महाराष्ट्रातील वेगवेगळ्या बोलीभाषांचे अगदी नैसर्गिक सौंदर्य जपण्यासाठी ह्या राजभाषा दिवसाला राज्यभर अनेक उपक्रम घेतले जातात...

मराठी राजभाषा दिवसाचे हे उपक्रम केवळ एकाच दिवशी सभागृहात उपचार म्हणून असू नयेत, तर ते लोकव्यवहारात यावेत, ह्यासाठी ते प्रत्येक शाळेतून, घराघरांतूनही साजरे करणे आवश्यक असते.

प्रवास करताना, वस्तू खरेदी करताना एकमेकांशी बोलताना, मातृभाषेतून बोलावे हा आपला आग्रह असायला हवा. ओघाने इतर भाषेचा एखादा शब्द बोलण्यात आला, तर लगेच संकोचण्याचे कारण नाही. पण मनात थोडे थांबून मराठी शब्द शोधण्याचा प्रयत्न करीत, पुढे आपण मराठीतून बोलायला हवे. अनेकदा तर कुठलेच कारण नसताना आपण परभाषेत बोलत असतो. काही वेळा तर असे होते की इतर भाषेत समोरच्या व्यक्तीशी बोलत असताना थोड्या वेळाने लक्षात येते की ती व्यक्ती हीसुद्धा मराठी भाषा बोलणारीच आहे. पण तेव्हा काहीसा उशीर झालेला असतो. आपण आपल्या भाषेतूनच संवादाची सुरुवात करायला हवी. उत्तम मराठी बोलण्याबाबत अनेक जण आळशीपणा करतात. तडजोडीची सवय होते. पर्याय जागरूकपणे शोधतच नाहीत. जे सहज, विशेष परिश्रम न करता जे शब्द ओठांवर येतात, त्याच परभाषेतील शब्दांच्या सोबतीने आपण संवाद साधत राहतो. त्या बोलण्यात कुठल्याच भाषेचे सौंदर्य नसते. उलट आपले अज्ञान आणि भाषिक आळशीपणा उघडा पडतो.

जरा गमतीने काही वाक्ये पाहूया अनेकदा कसे विद्रुप, चुकीचे बोलले जाते ते.

१) मी तुझ्यासाठी वेट करतो.

२) तू फर्स्ट लेफ्ट साइडला टर्न घे, देन राईट घे.

३) ए, ॲपल जरा कट करून दे ना!

हा मराठी भाषेला मिंग्लिश करणारा प्रकार निश्चितच प्रयत्नपूर्वक थांबायला हवा.

जरा क्षणभर विचार केला तर आपल्या भाषेतील अगदी जवळचे शब्द आपल्याला सुचू शकतात. वरील वाक्ये आपण स्वच्छ मराठीत बोलू शकतो ना? क्रमाने पहा:

१) मी तुझी वाट पाहतो. प्रतीक्षा करतो, योग्य, पण बोलताना कृत्रिम. पण वाट पहातो, हे अवघड आहे का?

२) तू आधी डाव्या बाजूला वळून, मग उजव्या बाजूचे वळण घे.

३) ए, जरा सफरचंद कापून दे ना!

इतके तर शक्य आहेच की.

कविवर्य सुरेश भट यांच्या 'मायबोली' या कवितेतील पुढील ओळी आपण अनेकदा मराठी अभिमान गीतातून ऐकतो.

**लाभले अम्हास भाग्य बोलतो मराठी**
**जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी**

याच कवितेतील त्यांच्या पुढील अप्रतिम ओळी पुन्हा पुन्हा वाचून त्यांचे मनन करू या. जगण्यात उतरवू या.

**आमुच्या मनामनात दंगते मराठी**
**आमच्या रगारगात रंगते मराठी**
**आमच्या उराउरात स्पंदते मराठी**
**आमच्या नसानसात नाचते मराठी!**

हे काव्य आपण अनेकदा ऐकतो, प्रार्थना म्हणतो. ती मराठी आपण खरंच आपल्या विचारातून जगतो का? याचा या मराठी राजभाषा दिवशी थोडा विचारपूर्वक विचार करायचा आहे.

अमृताशी पैजा जिंकत, आपले जगणे संपन्न करणारी, जिच्या चरणाचा टिळा भाळी श्रद्धेने लावावा अशी ही मधुर मराठी!

मराठी राजभाषा दिवस तिच्या गौरवाचा दिवस!

पालक आणि शिक्षक यांनी त्यासाठी आग्रही असणे अतिशय आवश्यक आहे. नवी पिढी हे आपले चालते बोलते प्रगती पुस्तक! ते पुस्तक अभिमानास्पद प्रगतीने, मराठी भाषेचा अमूल्य ठेवा जपून, प्रयत्नपूर्वक समृद्ध करू या.

कविवर्य सुरेश भट यांनी आपल्या मराठी भाषेचा गौरव करताना जे म्हटले आहे, ते वाचताना ऊर नि डोळे भरून येतात. खरेच आहे

**आमुच्या कुलाकुलात नांदते मराठी**
**येथल्या फुलाफुलांत हासते मराठी**
**येथल्या दिशादिशात दाटते मराठी**
**येथल्या नगानगात गर्जते मराठी**
**लाभले अम्हास भाग्य बोलतो मराठी**
**जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी!**

मराठीत बोलू या, ऐकू या! आपला मराठी राजभाषा दिवस प्रत्येक क्षणी साजरा करू या!

(समाप्त)

**संपर्क : ९८२०३८९४१४**

**'किशोर' हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक हेमंत बाबर यांनी मे. प्रिंटप्लस प्रा. लि., गाळा नं. १ ते १०, ई-१, जय जलाराम इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपलास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१३११. येथे छापून 'बालभारती', सेनापती बापट रोड, पुणे ४११००४ येथे प्रसिद्ध केले. * संपादक – अनुराधा ओक.**

**'Kishor' monthly publication is owned by Bureau of Text Book Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Hemant Babar, Printed at M/s. Printplus Private Limited, G1 to G10, E-1, Jai Jalaram Industrial Complex, Village Pimplas, Taluka-Bhiwandi, Dist-Thane 421311 and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune-411004.**
*** Editor - Anuradha Oak.**

# काळाचा मेळ जुळवा बरं!

डॉ. नीलिमा गुंडी

''आई, मला एक शंका आहे! पटकन सांग!'' केदारने आईला विचारले. ''अरे, कसली घाई आहे इतकी! मी भाजी चिरते आहे. ''थांब जरा!'' आई म्हणाली, भाजी नंतर चीर! आधी मला सांग मला आवडणारा तो 'ळ' च्या यमकांचा अभंग कोणाचा आहे? मला तो गृहपाठात लिहायचा आहे!'' ''का? एकदम गृहपाठ?



आणि अभंग?'' आईला आश्चर्य वाटले. ''अगं, गृहपाठात यमके, अनुप्रास या अलंकारांचे एक उदाहरण लिहायचे आहे.'' केदारच्या या उत्तरावर आईने अभंग म्हणून दाखवला तो असा.

''अवचिता परिमळु, झुळकला अळुमाळु
मी म्हणे गोपाळु, आला गे माये !

हा अभंग संत ज्ञानेश्वरांचा आहे!'' आई म्हणाली, ''मी ऐकला आहे. लतादीदींनी म्हटला आहे तो अभंग! पण मला प्रश्न पडला आहे. परिमळु, गोपाळु हे शब्द असे वेगळे का आहेत? त्यांचा अर्थ काय?'' केदारचे प्रश्न संपत नव्हते..

आईची भाजी चिरून झाली होती. ती केदार जवळ येऊन बसली. त्याला समजावून सांगू लागली.

''हे बघ केदार, तुला आता माहीत आहे की, मराठी ही अभिजात भाषा आहे! अभिजात म्हणजे प्राचीन आणि समृद्ध! आता प्राचीन भाषा आजपर्यंत पोहोचताना काळाच्या टप्प्यावर थोडी बदलत असते. त्यामुळे तेराव्या शतकात म्हणजे संत ज्ञानेश्वरांच्या काळात अकारान्त शब्द उकारान्त लिहायची पद्धत होती. त्यामुळे परिमळु, गोपाळु, हे शब्द म्हणजे आजचे परिमळ, गोपाळ, हेच शब्द आहेत. त्यांचा अर्थही आजचाच आहे. जसं की, परिमळु म्हणजे सुगंध. मात्र जेव्हा तुला एखाद्या शब्दाचा अर्थ शोधायचा असतो. तेव्हा शब्दाचा त्या लेखनाच्या काळाशीही मेळ जुळवायचा असतो. म्हणजे अर्थ लागतो! हे लक्षात ठेव!''

आईच्या म्हणण्यावर केदारने मान डोलावून समजल्याचा अभिनय केला. तो म्हणाला, ''अगं आई, म्हणजे आपली पणजी नऊवार साडी नेसायची. आजी पाचवार साडी नेसायची, तू पंजाबी ड्रेस घालतेस! तसे हे शब्द काळाबरोबर पोशाख बदलतात की काय? गंमतच आहे. कोणी प्रत्यय बदलतात. कोणी एखादे अक्षर बदलतात. आता मी नीट लक्षात ठेवीन!''

आई म्हणाली, ''केदार, अगदी बरोबर बोललास तू! ज्ञानेश्वरीत 'मियां' असे शब्दाचे रूप येते ते आपण आज वापरत नाही. आपण 'मी' किंवा 'माझ्याकडून' असे म्हणतो. आहे की नाही शब्दाच्या रूपात बदल?




प्रत्यय बदलला की शब्दाचे रूप बदलते. तसेच भाषेचे ही रूप बदलते. त्यामुळे अडलेला शब्द कोणत्या काळात लिहिलेला आहे. याचाही शोध घेतला की अर्थाचा पत्ता सापडतो!''

''अगं आई, 'ज्ञानेश्वरी मध्ये 'उन्मेख' शब्द आहे तो मी आबांच्या तोंडून ऐकला आहे. ते 'ज्ञानेश्वरी' वाचत होते. तेव्हा मला 'उन्मेख' म्हणजेच 'उन्मेष' जुने शब्दरूप वेगळे आहे. त्यात 'ष' ऐवजी 'ख' आहे. मात्र अर्थ आजही तोच रहिला आहे.'' केदार भरभरून बोलत होता.

''केदार, तुला आठवतं का? तू लहान असताना आपण कर्नाटक राज्यात सहलीला गेलो होतो. तिथे श्रवणबेळगोळ येथे डोंगरावर एक प्रचंड पुतळा होता गोमटेश्वरांचा! त्यांच्या पायाशी मराठीतला जुना शिलालेख कोरलेला होता. तो शोध पाहू! म्हणजे तुला शब्द कसे आणि किती प्रकारे बदलतात, ते कळेल! जुने लेखन काही वेळा मोडी लिपीत असे. तिथेही हा पेच येतो. ती लिपी आधी समजून घ्यावी लागते. असा शब्दाचा त्या त्या काळाशी असलेला संदर्भ कळला की अर्थ कळतो. कळलं का? ''आई म्हणाली.

''आई, मला एक प्रकल्प करायला सांगितला आहे. मी जुन्या मराठी शब्दांची, शिलालेखांची माहिती मिळवून छान प्रकल्प करीन. मजा येईल!'' केदारने पटकन ठरवले सुद्धा!

''शाब्बास! काही माहिती हवी असेल तर, खूप पुस्तकं आहेत बरं आबांकडे!'' आई हसून म्हणाली.

(समाप्त)

**संपर्क : ९८८१०९१९३५**

# गंमत शब्दांची

प्रा. विश्वास वसेकर

संपर्क : ९९२२५२२६६८



## जितराब

जितराब या शब्दाचा मूळ अर्थ, बागायती शेतीला उपयोगी पडणारी जनावरे असा आहे. कालांतराने ‘बागायती शेतीला उपयोगी पडणारी’ हा विशेष गळून पडला आणि ‘शेतकऱ्याने पाळलेले प्राणी’ हा अर्थ रुढ झाला. मग त्यांत कुत्रा, मांजर, शेळी, घोडा, गाय, म्हैस, बैल हे सगळे प्राणी आले.

## ताटवा

कापसाच्या पराट्यापासून विणून तयार केलेले एक साधन. हा ताटवा चौकोनी किंवा लांब असू शकतो. आवश्यकतेनुसार त्याचा आकारदेखील लहान मोठा करता येतो. ताटव्याचा उपयोग निवारा उभारण्यासाठी होतो. झाडाच्या फांद्यांपासून बनवलेला ताटवा झोपडीला आडवा लावून त्याचा दरवाजासारखा उपयोग करता येतो. मुक्ताई ‘ताटी’ उघडा ज्ञानेश्वरा म्हणतो तो हाच ताटवा.





## तिफण

बी पेरण्याचे तीन फण असलेले साधन. हे लाकडी असते. यास नळे व चाटे जोडून बी पेरले जाते. सरत्याने बी पेरावयाचे किंवा खत घालताना असल्यास फणाच्या मागे सरते लावता येते. लाकडाऐवजी लोखंडाच्या तिफणीचाही उपयोग केला जातो.

## अभिजात

कोणतीही गोष्ट उच्च दर्जाची, श्रेष्ठ अशी असल्याने सांगायचे झाल्यास, त्यासाठी त्या गोष्टीला ‘अभिजात’ हे विशेषण लावले जाते. ‘अभि’ हा उपसर्ग मुळात विशिष्टता, श्रेष्ठता, इतरांपासूनचा वेगळेपणा हे गुण दाखवणारा आहे. अभिजात मध्ये ‘जात’ याचा अर्थ... निर्माण झालेली कोणतीही गोष्ट! अभिजात म्हणजे निर्माण होतानाच जी गोष्ट श्रेष्ठ, वैशिष्ट्यपूर्ण, उच्च दर्जाची, सर्वसाधारण तत्सम गोष्टीपेक्षा वेगळी आहे ती गोष्ट. आपली मराठी भाषा इतर भाषांहून श्रेष्ठ भाषा आहे म्हणून अभिजात मराठी.




(समाप्त)

# प्रश्नमंजुषा

डॉ. सुधीर मोरे

**१) 'आचारस्थल' या ग्रंथात 'महंत राष्ट्र म्हणौनि महाराष्ट्र' अशी थोरवी कोणी गायली आहे?**

अ) दामोदर पंडित  आ) भास्करभट्ट बोरीकर
इ) केशवबास  ई) विश्वनाथबास बीडकर

**२) मराठीतील पहिली गीताटीका कोणती?**

अ) ज्ञानेश्वरी  आ) यथार्थ दीपिका
इ) गीताई  ई) अमृतानुभव

**३) महाराष्ट्राचे आद्य लोकसाहित्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'गाथासप्तशती' या ग्रंथाचे संकलन कोणी केले आहे?**

अ) रामदेवराय यादव  आ) हेमाद्री पंडित
इ) हाल सातवाहन  ई) चंद्रगुप्त मौर्य

**४) २७ फेब्रुवारी हा दिवस 'मराठी भाषा गौरव दिवस' म्हणून कोणाच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो?**

अ) विष्णु वामन शिरवाडकर
आ) विष्णु सखाराम खांडेकर
इ) गोविंद विनायक करंदीकर
ई) कृष्णाजी केशव दामले

**५) 'नको देवराया अंत आता पाहू' हा अभंग कोणी रचला आहे?**

अ) संत कान्होपात्रा  आ) संत बहिणाबाई
इ) संत जनाबाई  ई) संत सावता माळी

**६) भारतीय संस्कृतीकोश कोणी लिहिला आहे?**

अ) पंडित महादेवशास्त्री जोशी
आ) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
इ) श्रीधर व्यंकटेश केतकर
ई) स.मा.गर्गे

**७) विनोबा भावे यांनी 'अमृताचा पुत्र' असा गौरव कोणाचा केला आहे?**

अ) बालकवी  आ) साने गुरुजी
इ) कुसुमाग्रज  ई) ग. दि. माडगूळकर

**८) 'बलुतं' हे आत्मकथन कोणाचे आहे?**

अ) लक्ष्मण गायकवाड
आ) नामदेव कांबळे
इ) दया पवार
ई) लक्ष्मण माने

**९) 'सरस्वती महल' हे ग्रंथालय कोठे आहे ?**

अ) पुणे (महाराष्ट्र)
आ) बडोदा (गुजरात)
इ) तंजावर (तमिळनाडू)
ई) इंदूर (मध्य प्रदेश)

**१०) 'आरती प्रभू' हे टोपणनाव कोणत्या कवीचे आहे?**

अ) गोविंद विनायक करंदीकर
आ) चिंतामण त्र्यंबक खानोलकर
इ) आत्माराम रावजी देशपांडे
ई) माणिक सीताराम गोडघाटे

(समाप्त)

**संपर्क : ९४२२०००६११**

**प्रश्नमंजुषा एप्रिल २०२६ ची उत्तरे**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ – अ | २ – इ | ३ – इ | ४– अ | ५ –अ |
| ६ –आ | ७ – ई | ८ – आ | ९ – आ | १० – अ |

# गोळावाला

अशोक कोतवाल

घरासमोर रोज येतो
एक गोळावाला
'गोला लो गोला' म्हणतो
लाल, पिला, काला

टिना, मोना, गोलू, सनी
घेतात लाल गोळा
मी मात्र वेगळा घेतो
खट्टा, मीठा, काला

जाऊन बसतो झाडाखाली
आम्ही सारे ऐटीत
गोळ्यावरती जीभ फिरवून
मग बसतो चोखीत

संपू नये गोळा लवकर
वाटत असते फार
रंगत जातात ओठ आणि
जीभ गारेगार

अशा गर्मीत उन्हापासून
होते जरा सुटका
गप्पा मारीत बसतो आम्ही
घटका दोन घटका

संपर्क : ९८५०११७५३९



# मामाच्या गावाला

## (एकांकिका)

प्रल्हाद जाधव

**प्रवेश पहिला :**

(प्रकाश उजळतो. वेळ दुपारची. मुंबईतील एका मध्यमवर्गीय घराचा हॉल. सुट्टीचा दिवस. रेडिओवर 'झुकुझुकु झुकुझुकु, आगीनगाडी' हे गाणे सुरू आहे. त्या तालावर राजू आणि बेबी धमाल करत नाचत आहेत. तोंडानेच इंजिनच्या शिट्टीचा आवाज काढत 'मामाच्या गावाला जाऊ या' म्हणत एकमेकांच्या मागे लागले आहेत.)

**आई :** (आतूनच) गप्प बसा रे कार्ट्यांनो! (राजू आणि बेबीचा धुमाकूळ चालूच. अखेर वैतागून ती बाहेर येते.) बाई-बाई, बाई-बाई! कहरच केला अगदी या मुलांनी!

**दोघेही :** (तोंडाने शिट्टी वाजवत पळत आहेत) कुऽऽ कुऽऽ, कुऽऽ कुऽऽ

**आई :** अरे गप्प बसा म्हणते ना? डोकं उठवलंत माझं. जरा कुठं आवरत होते तेवढ्यात सुरू झालं तुमचं 'मामाचं गाव!' गप्प बसा म्हणते ना! तोंडातून एक शब्द काढलात तर जिभेवर डाग देईन एकेकाच्या चांगला!

**पात्रे : राजू – (१४ वर्षे), बेबी – (१० वर्षे), आई – (४० वर्षे), मामा – (३५ वर्षे), मामी – (३० वर्षे)**



**राजू :** आई, तू आम्हांला मामाच्या गावाला नेत नाहीस ना म्हणून आम्ही आपलं मामाच्या गावाला जाण्याचं गाणंच म्हणतोय. हो की नाही गं बेबी?

**बेबी :** हो ना! नुसतं गाणं म्हणूनच मामाच्या गावाला जाण्याचा आनंद मिळवतोय, दुसरं काय?

**आई :** अरे पण आत्ता गणपतीच्या सुट्टीत जाऊन आलो ना आपण तिकडे? सारखं सारखं काय जेवण वाढून ठेवलंय का तिथं?

**बेबी :** मामीच्या हातच्या जेवणाची नुसती आठवण झाली तरी तोंडाला पाणी सुटतं. व्वा, क्या बात है! काय ती गरम गरम तांदळाची भाकरी...

**राजू :** ताजी ताजी माठाची भाजी...

**बेबी :** ताज्या ताज्या कैऱ्यांचं लोणचं...

**राजू :** चांगला टमटमीत कांदा... रसरशीत टॉमेटो.

**बेबी :** सोबत हिरव्यागार मिरच्यांचा ठेचा...

**राजू :** वर घरच्याच म्हशीचं तूप...

**आई :** बाई, बाई-बाई-बाई ! काय सवकल्यात तुमच्या जिभा! आणि काय रे, मी रोज रोज काय पिठलं-भात करून घालते की काय तुम्हांला?

**बेबी :** पिठलं-भातसुद्धा किती छान करते मामी!

**आई :** आणि मी नाही करत? वर तुमच्या त्या गाण्यात म्हटल्याप्रमाणे रोज रोज पोळी - शिकरण आणि अधूनमधून गुलाबजामसुद्धा करते की नाही?

**बेबी :** तसे आम्हांला 'गुलाबजाम' मिळतात पण-

**आई :** पण काय?

**राजू :** तुझ्या 'गुलाबा'मध्ये गुलाब कुठेच नसतात; काटे मात्र 'ज्याम' असतात!

**आई :** अस्सं?

**बेबी :** आणि बरं का मम्मी, तुझ्या हातचं 'शिकरण' खाल्लं ना, की हमखास 'जागरण' होतं

**आई :** ते का गं कार्टे?

**बेबी :** ते खाल्लं की शिंका यायला लागतात आणि 'शिक' पडल्यामुळे जागं राहावं लागतं.

(आईची अशी फिरकी ताणत दोघेही खिदळत आहेत. ती त्यांच्या मागे मागे. तिच्या तावडीत सापडू नये म्हणून दोघेही पळापळी करत आहेत)

**आई :** तुमच्या एकेकाच्या जिभेवर आता अगदी चरचरून डाग देते चांगला, त्याशिवाय सुधारणार नाही तुम्ही. (तोवर राजू एका उंच जागी जाऊन उभा राहिलेला आहे.)

**राजू :** (हातातील पत्र फडकवत) डाग खुशाल दे आई! पण त्या आधी जरा हे पत्र वाच बघू!

**आई :** अगंबाई पत्रं? आणि ते कधी आलं? बघू बघू कुणाचं आहे ते!

**राजू :** हं, घे! (हुलकावण्या देत ती पुरेशी त्रासलेली आहे हे पाहून पत्र देतो.)

**आई :** (पाहत) छान! आधीच फोडलेलं दिसतंय तुम्ही! बघूया कुणाचंय ते! (मोठ्यानं वाचू लागते)

प्रिय सौ. ताई या उभयतांस,

आपला भाऊ शंकरदादा याचा दंडवत.

पत्रास कारण की सौ. पार्वती नुकतीच बाळंत झाली. मुलगा झाला. बाळ- बाळंतीण सुखरूप आहेत. येत्या रविवारी बारसे धरले आहे. तरी वेळात वेळ काढून यावे. वाट पहात आहे.

आपला,

शंकर.

ता. क. - येताना राजूला आणि बेबीला जरूर जरूर आणावे.

**दोघेही :** (आनंदाने) मामा-मामी ऽऽऽ झिंदाबाद!

**राजू :** मामा मामा मामी मामी ऽऽऽ

**बेबी :** झिंदा झिंदा झिंदाबाद ऽऽऽ

**राजू :** मामा-मामीचा ऽऽऽ

**बेबी :** विजय असो ऽऽऽ

**आई :** बाई-बाई-बाई बाई! अरे काय मोर्चा-बिर्चा आणलात की काय घरावर?

**राजू :** होय ! बरोबर ओळखलंस मोर्चाच आणलाय. (ओरडत) आमच्या मागण्या ऽऽऽ

**बेबी :** मान्य करा ऽऽऽ

**राजू :** नाहीतर खुर्च्या ऽऽऽ

**बेबी :** खाली करा!

**आई :** बरं बरं, काय मागण्या आहेत तुमच्या?

**बेबी :** आमची फक्त एकच मागणी आहे.

**राजू :** आम्हांला मामाच्या गावी जायचे आहे. काय वाट्टेल ते झालं तरी चालेल पण आम्ही मामाच्या



बारशाला जाणारच!

**बेबी :** (खिदळत) मामाच्या नाही, मामाच्या मुलाच्या बारशाला!

**राजू :** तेच ते!

**आई :** आणि समजा, मी जर तुमची ही मागणी मान्य केली नाही, तर काय करणार तुम्ही माझं?

**बेबी :** आम्ही बाबांकडे तक्रार करू.

**आई :** काय तक्रार करणार?

**बेबी :** आम्ही त्यांना सांगू की ही आई आमच्यावर अन्याय करते. तिला बदलून तिच्या जागी दुसरी आई आणा!

**आई :** असं सांगणार तुम्ही त्यांना?

**राजू :** सांगणार म्हणजे सांगणार–

**बेबी :** अगदी त्रिवार सांगणार!

**आई :** खुशाल सांगा, घाबरतंय कोण तुमच्या बाबांना?

**राजू :** आम्ही पटवून देऊ बाबांना!

**आई :** काय पटवून देणार? तुम्हांला माहीत आहे ना, बाबा काल नागपूरला गेलेत ऑफिसच्या कामासाठी? चांगले आठदहा दिवस राहणार आहेत ते तिकडे! ते आले की खुशाल तक्रार करा. तोवर मी शंकरदादाकडे बारशाला जाऊन येते!

**राजू :** म्हणजे आम्हांला नेणार नाहीस तू?

**आई :** एकदा नाही म्हटलं की समजतं ना?

**बेबी :** खरंच नाही नेणार?

**आई :** नाही, नाही, त्रिवार नाही!

**बेबी :** (रडकुंडीला येत) असं काय करतेस आई? प्लीज... घेऊन जा ना आम्हांला...

**राजू :** आई प्लीज.. तू कित्ती चांगली आहेस.

**बेबी :** हो किती चांगली आहेस ग तू आई!

**आई :** लाडीगोडी लावून काही फायदा नाही.

**बेबी :** पण आम्हांला नेण्यात तुझी अडचण काय? डोकीवरनं उचलून न्यायचंय का आम्हांला?

**आई :** गाड्यांना गर्दी किती वाढलीय बघताय ना? त्यात आयत्या वेळी रिझर्व्हेशनसुद्धा मिळणार नाही. या गर्दीतून मी तुम्हांला नेऊ शकत नाही!

**बेबी :** कसली गर्दी आलीय, म्हशीची शिंग काही म्हशीला जड होत नाहीत!

**आई :** (किंचाळत) काय? काय म्हणालीस बेबी?

**बेबी :** म्हशीची शिंग म्हशीला जड होत नाहीत!

**आई :** स्वतःच्या आईला म्हैस म्हणतेस?

**बेबी :** तसं नव्हतं म्हणायचं मला!

**आई :** उद्या बाबांना रेडा म्हणशील...

**राजू :** म्हणजे आपलं घर हा एक गोठा झाला... (म्हॅऽऽऽ करून ओरडतो)

**आई :** तू चूप रे! (बेबीला) स्वत:च्या आईला म्हैस म्हणतेस? तुझ्या जिभेवर डाग देते चांगला.

**बेबी :** तसं नाही गं आई, काल आम्हांला वर्गात वाक्प्रचार शिकवलेत. 'म्हशीची शिंग काही म्हशीला जड होत नाहीत' हा त्यातलाच एक. गुरुजींनी सांगितलंय की वाक्प्रचारांचा बोलण्यात नेहमी उपयोग करत जा म्हणून.

**आई :** पण म्हणून काय स्वत:च्या आईचा वाक्यात उपयोग करायचा? ते काही नाही, आता मी तुम्हांला सोबत नेणार तर नाहीच, पण कशी अद्दल घडवते तेही बघा!

**राजू :** आडात नाही तर पोहऱ्यात कुठून येणार?

**आई :** छान! तूही केलास वाटतं स्वत:च्या आईचा वाक्यात उपयोग?

**राजू :** हे बघ, तुझ्याइतकी प्रेमळ आई या जगात शोधून सापडणार नाही. तू आम्हांला शिक्षा करणं शक्य नाही, म्हणूनच म्हटलं की आडात नाही तर पोहऱ्यात कुठून येणार? (बेबीला) आहे की नाही गं आपली आई प्रेमळ?

**बेबी :** अगदी प्रश्नच नाही. 'मातृ देवो भव!', 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी,' आईसारखे दैवत साऱ्या जगतामधे नाही ' बोला मम्मीचा ऽऽऽ...

**राजू :** विजय असो.

**बेबी :** आईचा ऽऽऽ

**राजू :** विजय असो!

**राजू :** (बेबीला) चल आपण दोघेही मिळून मातेचे दर्शन घेऊ या! (दोघेही तिला लोटांगण घालतात आणि तिचे पाय पकडून ठेवतात.)

**आई :** अरे अरे अरे अरे! काय नाटक संचारलंय का काय तुमच्या अंगात?

**बेबी :** तू आम्हांला नेणार की नाही सांग!

**आई :** तुम्ही कितीही कल्पना लढवल्यात तरी मला दया येणार नाही. तुमच्यासारखी आगाऊ मुलं, असण्यापेक्षा नसलेली बरी!

**राजू :** (रडवलेल्या सुरात) खरंच का गं आई आम्ही तुला नकोसे झालो आहोत?

**बेबी :** सांग, खरंच आम्ही तुला नको झालोत का?

**राजू :** आम्ही चेष्टा करत होतो तुझी एवढं पण कळत नाही का तुला?

**आई :** चेष्टा करत होता?

**राजू :** हो ना, वाटल्यास माफी मागतो तुझी.

**दोघेही :** सॉरी आई सॉरी! परत तुला त्रास होईल असं कधीही वागणार नाही.

**आई :** (त्यांना कुशीत घेत) नाही रे बाळांनो! कशाला माफी मागताय माझी? तुम्ही दोघे म्हणजे माझे अगदी चंद्रसूर्य आहात. माझ्या काळजाचे तुकडे आहात. मला अगदी हवेहवेसे आहात...

**राजू :** तर मग जायचं ना मामाच्या गावाला?

**आई :** हो! चला तयारीला लागा!

(दोघेही आनंदाने आरडाओरडा करायला लागतात. प्रकाश हळूहळू कमी होत जातो. आई माझा निळा फ्रॉक कुठाय, माझी वॉटर बॅग घे गं आई, अरे हा चिवड्याचा डबा वरच्याच पिशवीत ठेवा, आई गं ट्रेनमध्ये वाचायला कॉमिक्स घेऊ का गं? अशी वाक्ये अंधारातून ऐकू येतात. मग एकदम आगगाडीची शिट्टी ऐकू येते. पाठोपाठ तिच्या धडधडत जाण्याचा आवाज. तो आवाज हळूहळू कमी होत जातो. नंतर काही क्षणांनी बैलाच्या गळ्यातील घुंगरांचा आवाज येतो. राजू आणि बेबी खुषीतच माझ्या मामाची रंगीत गाडी हो, तिला खिल्लाऱ्या बैलांची जोडी हो हे गाणं म्हणत आहेत. मधूनच थुर्रऽऽ हैक ! हैक असा, बैल हाकलताना काढतात तसा गाडीवानाचा आवाज येत आहे. हळूहळू पूर्ण अंधार.)

(क्रमशः)

**संपर्क :** ९९२००७७६२६

योगेश दराडे

'किशोर' मित्रांनो,
'किशोर' एप्रिल २०२६ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे 'किशोर'कडे २५ मे २०२६ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत किंवा ई-मेल करावा.

# कुतूहल

संपर्क : ९९२३७४०३७४

**१) महाराष्ट्र राज्याची स्थापना करण्यासाठी किती लोकांनी आपले बलिदान दिले आहे?**

अ) १००　　ब) ११७

क) १०५　　ड) १२०

**२) 'आंतरराष्ट्रीय कामगार दिवस' कधी साजरा केला जातो?**

अ) १ मे　　ब) ४ मे

क) ६ मे　　ड) ७ मे

**३) 'हिवाळी ऑलिम्पिक स्पर्धा २०२६' कोणत्या देशात आयोजित करण्यात आली?**

अ) रशिया　　ब) कॅनडा

ब) इराण　　घ) इटली

**४) जागतिक ऑलिम्पिक समितीचे (IOC) नेतृत्व करणाऱ्या पहिल्या महिला कोण आहे?**

अ) क्रिस्टीना लिगार्ड　　ब) किर्स्टी कोव्हेंट्री

क) कर्स्टी कॉवेन्ट्री　　ड) अँजेला मर्केल

**५) 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६' कुठे पार पडली?**

अ) कोलकत्ता　　ब) दिल्ली

क) मुंबई　　ड) नागपूर

**६) राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी २०२६ मध्ये कोणत्या ऐतिहासिक व्यक्तीच्या पुतळ्याचे राष्ट्रपती भवनात अनावरण केले?**

अ) चक्रवर्ती राजगोपालाचारी

ब) राजेंद्र प्रसाद

क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

ड) लाला लजपतराय

**७) भारतीय संसदेच्या अधिवेशनाची सुरुवात कोणाच्या भाषणाने करतात?**

अ) पंतप्रधान

ब) राज्यसभा अध्यक्ष

क) राष्ट्रपती

ड) लोकसभा अध्यक्ष

**८) 'जागतिक पत्रकारिता स्वातंत्र्य दिवस' केव्हा साजरा केला जातो?**

अ) १ मे　　ब) ३ मे

क) १६ मे　　ड) १७ मे

**९) 'गगनयान-१' मोहिमेमध्ये कोणता रोबोट पाठवला जाणार आहे?**

अ) रोबो - १　　ब) स्ट्रो बॉट

ग) व्योमित्र　　ड) विक्रम

**१०) YUVIK कार्यक्रमाचा उद्देश काय आहे?**

अ) मुलींना विज्ञानाचे प्रशिक्षण देणे

ब) शिक्षकांना अंतराळ विज्ञानाचे प्रशिक्षण देणे

ग) विद्यार्थ्यांना अंतराळ विज्ञानाचे प्रशिक्षण देणे.

घ) महिलांना आर्थिक साक्षर बनवणे.

**११) भारतातील सर्वाधिक वनक्षेत्र असलेले राज्य कोणते?**

क) महाराष्ट्र　　ख) हरियाणा

ग) मध्य प्रदेश　　घ) राजस्थान

**१२) भारताचा पहिला अणुऊर्जा प्रकल्प (तारापूर) कोणत्या जिल्ह्यात आहे?**

अ) अहिल्यानगर ब) धाराशिव

क) पालघर ड) छत्रपती संभाजीनगर

**१३) महाराष्ट्राचे राज्यपाल कोण आहेत?**

अ) श्री. प्रकाश शर्मा

ब) श्री. रमेश बैस

ग) श्री.जिष्णू वर्माजी

ड) श्री. भगत सिहं कोश्यारी

**१४) 'आंतरराष्ट्रीय बिबट्या दिवस' केव्हा साजरा केला जातो?**

अ) १६ मे ब) १८ मे

क) ३ मे ड) २२ मे

**१५) किती महाराष्ट्रीय व्यक्तींना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे?**

अ) ६ ब) १२

क) ४ क) २

---

## एप्रिल २०२६ च्या चित्रकोड्याचे उत्तर




## कुतूहल (एप्रिल २०२६) ची उत्तरे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) ब | २) ड | ३) ड | ४) ड | ५) ब |
| ६) ड | ७) क | ८) क | ९) ड | १०) ड |
| ११) क | १२) क | १३) अ | १४) ब | १५) ड |

## चित्रकोडे (मार्च २०२६) यशस्वी स्पर्धक

**सिंधुदुर्ग –** चिन्मय चव्हाण
**मुंबई –** अदिती जरळी
**अकोला –** कु. रफियुन्निसा खान
**यवतमाळ –** कु. सुहानी कालोकार, कु. दृवरा गावंडे, कु. गौरी चौधरी, कु. नंदिनी पंधराम, कु. रोनक ठाकरे, कु. दिव्या केसकर, कु. सोनाक्षी अर्के
**सातारा –** कु. पर्व फडे, कु. सुवीर फडे, कु. श्वेता साळुंखे, कु. शौर्य सरगडे, कु. रुचिता चव्हाण, कु. सई पवार, कु. राधा पवार, कु. सिद्धी चव्हाण, कु. अर्णव क्षीरसागर, कु. रितेश निकाळजे, कु. प्रथमेश पवार, कु.चिन्मय जाधव, कु. राज बोडरे, कु. आरूष जाधव, कु.आदर्श सत्यवान
**सोलापूर –** कु. वेदांगी शिंदे, शनय भोसले
**अकोला –** कु. साक्षी ठाकरे, कु. राजनंदनी देवकर, कु.आचल बुधे, कु. हर्षा वायले, कु. सानिका ठाकरे, कु.प्रतीक्षा लठाड, कु. जान्हवी पांडे, कु. नंदिनी खुळे
**रत्नागिरी –** कु. शिवन्या रणदिवे, कु. अनुष्का गमरे, कु. ईबाद चोगले, कु. जुवेरिया जोगले, कु. साजिरी भुवड, कु. सानिध्य भुवड, कु. तेजस भुवड, कु. अर्णव जाधव, कु. अनिश भुवड, कु. सोहम भुवड, कु. मानस जावळे, कु. शरिफा चोगले, कु. अन्वेश जाधव,
**पुणे –** कु. संध्या इंगोले, कु. रोहिताक्ष करंजावकर,
**कोल्हापूर –** कु. राजवीर कांबळे, कु. ईश्वरी देसाई, कु.शांभवी कुलकर्णी
**सांगली –** कु. विरेश दहिटणकर, कु. शौर्य गुडीमणी, कु. शर्वरी व्हनमोरे, कु. शार्दुल व्हनमोरे
**नांदेड –** कु. जैदशेख, कु. जिक्रा शेख

## कुतूहल (मार्च २०२६) यशस्वी स्पर्धक

**सिंधुदुर्ग –** चिन्मय चव्हाण
**मुंबई –** अदिती जरळी
**अकोला –** कु. रफियुन्निसा खान
**सातारा –** कु. पर्व फडे, कु. सुवीर फडे, कु. रुरचिता चव्हाण, कु. सई पवार, कु. राधा पवार, कु. सिद्धी चव्हाण, कु. अर्णव क्षीरसागर, कु. रितेश निकाळजे, कु. प्रथमेश पवार, कु. चिन्मय जाधव, कु. राज बोडरे, कु. आरूष जाधव, कु. आदर्श सत्यवान,
कोल्हापूर – कु. ईश्वरी देसाई

# भावी आधारस्तंभ

माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.

* तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?
* जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?
* ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हांलाही वाटते ना?

**मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे – 'भावी आधारस्तंभ', तुम्हांला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु.५/–चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.**



माझा वाढदिवस होता. वाढदिवस म्हणजे आनंदाचा दिवस. माझ्या वाढदिवसानिमित्त मी असा निश्चय केला की, गरीब मुलांना आपण जेवण वाटप करू या. कारण त्या मुलांना पोटभर आणि चांगले जेवण मिळत नाही. मी माझा निर्णय आई बाबांना सांगितला. त्यांना ऐकून खूप छान वाटले. मग आम्ही एका हॉटेलवाल्या काकांना सांगितले की, आम्हांला काही मुलांसाठी भाजी पोळी अन् गुलाबजाम बनवून पॅक करून द्या. त्यांनी ते जेवण आम्हांला छान पॅक करून दिले. ते घेऊन आम्ही एका सिग्नल वर थांबलो. तिथे बरीचशी मुलं होती. त्या मुलांना मी माझ्या हाताने जेवण वाटप केले. ते मुलं खूप आनंदी झाले. त्यांचे चेहऱ्यावरचे हसू बघून मला खूप छान वाटले. प्रत्येकाने अशा वेगळ्या पद्धतीने आपला वाढदिवस साजरा करायला हवा.

**कु. वैदिक स्वरा पराग खराटे**
इ.५वी, विद्या प्रबोधिनी प्रशाला मराठी माध्यम रामभूमी,
डॉ. मुंजे मार्ग, नाशिक ४२२००५.



मी जाधववाडी या ठिकाणी राहते. माझे घर हे रस्त्याच्या बाजूला आहे. माझ्या घरासमोर रस्ता असल्याने नेहमी गाड्या जात येत असतात. एक दिवस अचानक आमच्या घराच्या जवळच काही अंतरावर मोटरसायकल चालवणारे एक काका खाली पडले.

ते पाहून आम्ही त्यांना मदत करायला गेलो. त्यांची गाडी बाजूला घेतली. त्यांना आमच्या घराशेजारी असलेल्या झाडाखाली दोन मिनिटे बसवले व त्यांना पाणी दिले नंतर त्यांना त्यांच्या नातेवाइकांना फोन करण्यासाठी सांगितले. नातेवाईक येऊन त्यांना ते घेऊन गेले. त्यांना आम्ही आसरा दिल्यामुळे त्यांना अतिशय बरे वाटले. त्यांनी व त्यांच्या नातेवाईकांनी मला धन्यवाद दिले. मला त्या काकांना मदत करून खूप आनंद झाला.

**कु. पूर्वा धनेश जाधव**
मु. पो. खोडद, ता. जुन्नर, जि. पुणे ४१०५०४



एके दिवशी मी घरी एकटी होते. आई बाबा काही कामानिमित्त बाहेर गेले होते. ताईचा पेपर होता. मी घरी छानपैकी 'किशोर' मासिक वाचत होते. तेवढ्यात कोणीतरी दरवाजा ठोठावला. मी आधी खिडकीतून पाहिले. तेथे एक आजोबा होते. मी त्यांना ओळखत नव्हते म्हणून मी खिडकी उघडली आणि म्हणाले, ''कोण पाहिजे '' मग आजोबा म्हणाले की, ''पोरी दोन दिवस झाले काही खाल्लं नाही, मदत कर'' मग मी घरी असलेल्या फळांपैकी दोन केळी त्यांना दिली. ते म्हणाले, ''पैके पाहिजे'' मग मी त्यांना माझ्या खाऊच्या पैशांतून तीस रुपये काढून दिले आणि म्हणाले, ''केळी पण तुमच्याकडेच राहू द्या.'' हे ऐकून आजोबांनी ''सुखी रहा'' असा आशीर्वाद मला दिला. मी हा प्रसंग आईबाबांना सांगितला. त्यांनी माझे कौतुक केले.

**कु. किशोरी शहाजी बाबर**
इ. ७वी, नाझरा विद्यामंदिर, ता. सांगोला, जि. सोलापूर-४१३३०१.



माझी शाळा चार वाजता सुटते. एकदा मी माझ्या मैत्रिणीसोबत रस्त्यानं जात होते. तेवढ्यात मला एक छोटा मुलगा पळताना दिसला. त्याच्या मागून एक गाडी खूप वेगाने येत होती. मी कशाचाच विचार न करता त्या मुलाच्या मागे धावत गेले आणि त्या मुलाला उचललं. गाडी चालवणाऱ्या व्यक्तीला मी समजावून सांगितले आणि तिथून जायला निघाले. तिथं थांबलेल्या लोकांनी मला बोलावले आणि माझे खूप कौतुक केले. मी त्या मुलाला घरी नेऊन सोडले, त्या मुलाच्या आई-वडलांनी माझे खूप कौतुक केले. मीपण घरी गेले, घरी गेल्यानंतर मी सगळं काही माझ्या आईवडलांना सांगितलं. हे ऐकून माझे आई-वडील खूप आनंदी झाले आणि म्हणाले 'असंच काम करत राहा!'

**कु. भक्ती आनंद डहाळे**
इ. ८वी, जि.प.प्रशाला सातोना (खुर्द), ता. परतूर, जि. जालना-४३१५०२.



आमच्या गावात एकदा दिंडी आली होती. मग मी दिंडीच्या पाया पडायला गेलो होतो. एक आजोबा बसले होते. त्यांनी मला हाक मारली. ते आजोबा मला म्हणाले, ''दिंडीमध्ये मी चालून चालून थकलो आहे. माझे पाय दाबून देतोस का? मला उद्या चालायला बरे वाटेल.'' मी लगेच 'हो' म्हटले. माझा सेवाभाव बघून ते आजोबा म्हणाले, ''खूप शीक, मोठा हो, दररोज शाळेत जात जा.'' आणि त्यांनी खाऊही दिला. नंतर मी घरी गेलो. आई बाबांना व आजीला सांगितले. त्यांनी माझे कौतुक केले व शाबासकी दिली आणि 'अशीच वृद्धांची मदत करत जा.' असे म्हणाले.

**कु. अमित शिवाजी गायकवाड**
इ. ८ वी, जि.प.प्राथमिक शाळा राघुचीवाडी, ता.जि.धाराशीव-४१३५०१.

# उमलती प्रतिभा

## चला कोकणाला

चला मुलांनो कोकण पाहू.
आनंदाने नाचू खेळू..
समुद्राच्या लाटांसंगे
दूर दूर जाऊन येऊ
नारळाच्या बागांमधूनी
पक्ष्यांचा नाद मधुर तो ऐकून घेऊ
आंब्याचा रस चाखुनी
गोड चवीचा आनंद घेऊ
चला मुलांनो कोकण पाहू
आनंदाने नाचू खेळू

**कु. ज्ञानेश्वरी पांडुरंग अधाने**
जि.प. केंद्र प्राथमिक शाळा गदाना,
ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर-४३११०१.

## आयुष्य काय असतं?

आयुष्य काय असतं?
ज्यात दु:ख आणि सु:ख दोन्हीही असतं
ते म्हणजे आयुष्य
आयुष्य काय असतं?
कुठे यश तर कुठे अपयश भेटणं
म्हणजे आयुष्य असतं.
आयुष्य काय असतं?
सर्वांसोबत चांगलं राहणं आणि
संयम ठेवणं
म्हणजे आयुष्य असतं.
आयुष्य म्हणजे काय असतं?
बघितलेल्या स्वप्नांना साकार करणं
म्हणजे आयुष्य असतं.
आयुष्य काय असतं?
संकटात असणाऱ्या व्यक्तींची मदत करणं
आणि दु:खी असणाऱ्या व्यक्तींना हसवणं
म्हणजे आयुष्य असतं.

**कु. श्रुती संतोष काळे**
जि. प.प्रशाला दुधगाव, ता.जिंतूर, जि.परभणी-४३१५४०.



कु. श्रेया सुहास पवार
इ.६ वी, जिल्हा परिषद शाळा वनवासमाची (नवी),
ता.कराड, जि.सातारा - ४१५००१.



कु. लोकेश जनार्दन विशे
इ. ७वी, जिल्हा परिषद शाळा, सोनावळे,
ता. मुरबाड, जि.ठाणे - ४००६०१.

# सागर आणि आजी

एका गावात एक आजी राहत असे. तिचा एक नातू होता. त्याचे नाव होते सागर. सागरला शाळेत जाण्याची खूप आवड होती. पण त्याच्याकडे तेवढे पैसेपण नव्हते म्हणून ती आजी खूप कष्ट करायची. त्याच्या शाळेच्या फीएवढे पैसे त्या आजीकडे आले व तिने सागरला शाळेत पाठवले. सागर दररोज शाळेत जाऊ लागला. तो शाळेत सर्वांत हुशार मुलगा झाला. एकदा सागरच्या शाळेत क्रिडामहोत्सव होता. तेव्हा त्याने कबड्डीच्या स्पर्धेत भाग घेतला. त्याने मैदान गाजवून शाळेचे नाव मोठे केले. अशा प्रकारे तो शाळेतील सगळ्या शिक्षकांचा आवडता विद्यार्थी झाला.

त्याच्या शाळेत 'ज्ञानी मी होणार' ही स्पर्धा झाली. त्याने त्या स्पर्धेत पहिला क्रमांक काढला. त्याने कशा प्रकारे कष्टाने हा क्रमांक पटकावला हे सर्व गावकऱ्यांनी पाहिले होते. आता प्रत्येक शिक्षक व प्रत्येक गावकरी त्याला त्याच्या कामात मदत करत असे.

तो आपल्या प्रत्येक मित्राशी चांगले वागत असे. तो आपल्या मित्राला जर अभ्यासात मदत हवी असेल तर करत असे. तो हळूहळू मोठा होत गेला. तो आता दहावीत होता. दहावीच्या बोर्ड परीक्षेत त्याचा पहिला क्रमांक आला. त्याचे नाव वर्तमानपत्रात आले. त्याने परीक्षेत पहिला क्रमांक मिळवला नाही असे झाले नाही. आता तो मोठा इंजिनिअर झाला होता. त्याने स्वतःसाठी आणि आजीसाठी घर बांधले. सागर गरजू व गरीबांना पैशाची गरज असेल तर देऊ लागला व सर्व लोकांनी त्याला चांगले आशीर्वाद दिले.

**कु. विर्तिका विठ्ठल शेर्लेकर**
इयत्ता - सहावी, जि.प.पूर्व प्राथमिक केंद्रशाळा, शेर्ले नं.१
सावंतवाडी, सिंधुदुर्ग-४१६५१४



**कु. शंतनू माधव मगर**
समर्थनगर, रिसोड, जि. वाशिम - ४४४५०६.



**कु. सागर लहू तनपुरे**
इ. ७ वी, सर्वोदय विद्यालय कुडवली,
ता. मुरबाड, जि.ठाणे - ४२१४०१.




© कथा व चित्रे - घनश्याम देशमुख

संपर्क : ९८२३४१३६२९



तितक्यात झाडीतून कुणीतरी बाहेर आलं.
थांब थांब, कुणीतरी रस्त्यात उभं आहे.
दोघांनी सायकली बाजूला उभ्या केल्या आणि ते त्या माणसाजवळ आले.
आजोबा, काही मदत हवी आहे का? कुठे चाललात तुम्ही?
तुम्ही कुठे चाललात? पुढे रस्ता बंद आहे.
आम्ही गाव बघायला चाललो.
तालुक्यावरून सकाळीच निघालो.. पुढे जे गाव आहे ना निंबोली, ते बघायचं आहे आम्हांला...
नको. तिकडे जाऊ नका... तिथं कुणीच राहत नाही. आता भयाण शांतता आहे निंबोलीत..
असू द्या. मी निंबोलीत लहान असताना राहायचो मावशीकडे. गावातले सगळे ओळखायचे मला.
कोण? नाव काय तुझं?
श्याम.. तू प्रभाकररावाचा भाचा ना? मी ओळखलं. तुला खरं सांगतो. गावात जाऊ नका. तिथं कुणीच नाही तरीसुद्धा घराघरांतून विचित्र आवाज येतात. चला परत चला!
श्याम जनकरावांच्या घरी राहायचो.
क्रमशः

# आई

जयवंत आवटे



असेन मी आगाऊ जरी, तरी खाते भाव मी
सुट्टीमध्ये फिरते, गाव अन् गाव मी.

कैऱ्या खाणे नि पोहणे, आहे माझा छंद
दप्तर ठेवते खुंटीला, अन् अभ्यास असतो बंद

पाऊस येतो वळीवाचा, सोबत घेऊन सुसाट वारा
डोके दुखते अंग तापते, वेचत असते जेव्हा गारा.

औषध कडू तोंड कडू, असेच असते सारे जग.
आपण झोपत नाही म्हणून, जागत राहते आई मग.

म्हणून देवा तुझ्यापुढे, मागणं आहे एक
भोवताली सुखं, असली जरी अनेक

सुट्टी संपेल, खेळ संपेल, संपेल सारी मजा
आई शिवाय जगण्याची, देऊ नको सजा.

संपर्क : ९८९०७१०३७९

# The Smiling Eyes

Sadanand Pundpal

In the month of May, it's very, very hot,
Enjoying the sweets that we had brought.
Sitting under a tree, so huge and tall,
Yellow leaves on our heads, would gently fall.

We watched the leaves fly high like kites,
Truly delighted by the wonderful sights.
With the strong wind, they soared so high,
As we tossed little stones into the sky.

Suddenly, we heard a feeble call,
And started searching around us all.
We felt worried hearing that cry,
Someone was suffering in the heat nearby.



We ran in that direction very fast,
And found a thirsty plant breathing its last!
The poor little plant looked so sad,
Seeing its sorrow made us feel bad.

For many days, we watered it with care,
Hoping new life would soon be there.
At last, it bloomed with tiny flowers,
Brightening all our happy hours.

Overjoyed were we, the little guys,
The plant thanked us with its smiling eyes.

Contact : 9404968829






Vikram and Manasi were the best of friends and shared a common interest in astronomy. One clear night, they decided to go to the hilltop to gaze at the stars, through their binocular, accompanied by Manasi's dog, Tommy.As Vikram was looking through the binocular up at the sky, they saw something strange - a flying soccer ball! It slowly descended and landed softly near them.

"Wow! What is this?" Vikram exclaimed.

"Looks like a spaceship!" Manasi said, eyes wide with wonder.

Out came an extra-terrestrial man, tall and slender, with a kind smile.

Vikram and Manasi were amazed as he emerged from the spaceship. "Namaste, young friends! I'm X1 from planet Indra, far away from Earth."

"Namaste, X1! Welcome to Earth!" Vikram replied, eyes wide with wonder.

X1 smiled. "Your planet is beautiful. We've been exploring the universe for eons, but I've never seen such diversity and complexity."

Manasi asked, "What brings you to Earth?"

"I'm on a mission to learn about your species and your planet," X1 replied. "I've heard about your intelligence, creativity, and capacity for both good and evil."

Vikram asked, "What do you think of our planet so far?"

X1 thought for a moment. "I'm impressed by your technological advancements but concerned about the harm you've caused to your environment and each other."

Manasi nodded. "We're working on it. We have our problems, but we're trying to make things better."

X1 smiled. "I sense hope and resilience in you both. That's encouraging."

As they talked, X1 noticed Tommy and was delighted. "What a wonderful creature! May I take him with me? I promise to return him soon."

Manasi hesitated, but X1 assured them, "Don't worry, I'll take both of you to my planet next time."

Vikram asked, "What's your planet like?"

X1's eyes sparkled. "Indra is a utopia. No wars, no countries, just one united world with advanced technology and harmony. You'll see wonders beyond your imagination."



Manasi exclaimed, “That sounds amazing! We can’t wait to visit!”

X1 smiled. “I’ll return soon. Keep exploring, keep discovering!”

As X1 departed with Tommy, Vikram and Manasi gazed up at the stars, eager for their next adventure.

Months passed, and X1 returned with Tommy. “Time to fulfil my promise!” he said with a smile.

X1 led them to his spaceship and explained, “We’ll use teleportation to reach Indra.”

In an instant, they found themselves on a breathtaking planet. Vikram and Manasi gasped in awe.

“Welcome to Indra!” X1 said proudly.

They saw robots working alongside humans, fast travel tubes, and incredible A.I.(Artificial Intelligence) innovations. The landscape was stunning, with crystal caves and shimmering waterfalls.

“But where are the animals?” Manasi asked.

X1 explained, “We’ve learned to coexist without them, preserving nature in perfect balance.”

Vikram and Manasi spent days exploring Indra, marveling at its wonders.

“This is a dream come true!” Vikram exclaimed.

“We’ll never forget this experience,” Manasi added.

X1 smiled. “You’re always welcome on Indra. Keep exploring, keep discovering!”

As they teleported back to Earth, Vikram and Manasi knew their friendship had reached new heights, inspired by the wonders of the universe.

As they returned to Earth, Vikram and Manasi couldn’t stop talking about their incredible adventure on Indra. They shared their story with friends and family, but no one believed them.

“Aliens? Teleportation? You guys must have watched too many sci-fi movies!” their friends teased.

But Vikram and Manasi knew what they experienced was real. They began to research more about space and astronomy, hoping to learn more about Indra and X1.

**Contact : 9763286990**

# Funny Puzzle

Ghanshyam Deshmukh

**Can you fit the cities into the grid below ?**

DUBLIN
LONDON
BONN
NICE
LISBON
BERLIN
WARSAW
DELHI
OTTAWA
LIMA
PARIS






**Count and name the animals.**



# चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

हे चित्राचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.




## सूचना

१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.

२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ मे २०२६.

३) कोड्याचे उत्तर जून २०२६ च्या अंकात प्रसिद्ध होईल.

४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

Registered Postal Regd.No. PCW/076/2024-2026 RNI NO. 22679/72
Date of publication 26.04.2026, Date of Posting - 27th & 28th April 2026 posted at PUNE PSO, GPO- 411 001

(License to Post without prepayment of postage No. WPP-53/2024-2026)




प्रति,

**If not delivered please return to :**
संपादक, 'किशोर' मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
'बालभारती', सेनापती बापट मार्ग,
पुणे - ४११ ००४.
दूरध्वनी : ०२० - २५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in